**बुद्धिदाता, कलांचा अधिपती, विघ्नहर्ता गणेश घरोघरी स्थानापन्न झाले आहेत. सार्वजनिक गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. मात्र या सगळ्याचा आनंद लुटत असताना सामाजिक भान, जाचणाऱ्या प्रश्नांचे गांभीर्य आणि त्यांच्या निराकरणासाठी या उत्सवाचा प्रभावी उपयोग करुन घेण्याचे वैचारिक धोरण नेमके असण्याची गरज आहे. स्वार्थाविना एकत्र येणाऱ्या समाजाने या मंगलकाळाचा योग्य उपयोग करणे उत्तम.**

# मन रंगले गणेशरंगी



गणेशोत्सव विशेष

**वैष्णवी कुलकर्णी**

घरोघरी तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये गणेशाची विधीवत स्थापना होऊन उत्सवातील उत्साह आता शिगेला पोहोचला आहे. गणपतीबरोबर येणाऱ्या ज्येष्ठागौरींचे लाडकोड पुरवल्यानंतर, त्यांचे माहेरपण यथासांग पार पडल्यानंतर उत्सवातील उरलेले दिवस अधिक मोकळेपणाचे जातील. एकंदरच हा सर्व काळ कुटुंबाने एकत्रित येण्याचा, कामांचे योग्य वाटप करुन आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा, यायोगे संस्कारांची अलगद पखरण होण्याचा, घरातील परंपरा नव्या पिढीपर्यंत अलगद पोहोचवण्याचा... त्यामुळेच म्हटले तर हा एक धार्मिक उत्सव आहे आणि म्हटले तर समाजातील सुप्त शक्तीं प्रेरित करण्याचा, समाजभान जागृतीचा, नवनवीन विषयांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठीचा एक प्रघातही आहे. त्यामुळे पाहू तितक्या अंगाने त्याची वेगवेगळी रुपे दिसतात आणि त्या त्या अनुरुप त्याचे महत्त्व वा उपयुक्तता अधोरेखित होते. या काळात गणेशाचे भाविक सुखावतात तसेच व्यापारी, उद्योजक, कारागिर, विक्रेते, नोकरदार, विद्यार्थी असे सगळेच सुखावतात. सणांच्या मोठ्या पर्वाचा प्रारंभ करणारे हे दिवस आर्थिक बरकतीचीही सुरूवात असते. तेव्हा त्याचे महात्म्य गणरायाच्या पार्थिव मूर्तीइतकेच प्रसन्नता देऊन जाते, हे नक्की.

आताही असे उल्हसित वातावरण अनुभवास मिळत आहे. चांगली बाब म्हणजे मे महिन्यापासूनच सुरू झालेल्या पावसाने पाण्याची चिंता मिटवली आहे. त्यामुळेच यंदाचा गणेशोत्सव भरल्या पोटी, भरलेल्या जलकुंभांनिशी साजरा होतोय. काही भागात पावसाने अतिरेक केला तर कुठे ओढ दिली... मात्र एकंदर स्थिती समाधानकारक असल्यामुळे चिंतामुक्त गणेशोत्सव असे सध्याच्या वातावरणाचे वर्णन नक्कीच करता येईल. खेरीज या काळात अतिउत्साही गर्दीमुळे होणारी वाहतूक कोंडी, मंडपांच्या भाऊगर्दीत रस्ते हरवल्याने कामावर पोहोचण्यासाठी करावी लागणारी कसरत, चढ्या भावाने मिळणाऱ्या वस्तू या आणि अशा गोष्टी अंगवळणी पडल्या आहेत. सोन्या-चांदीने किमतीची उच्च पातळी गाठल्यानंतरही या अनमोल धातूंचे अलंकार श्रींसाठी वा आपल्यासाठी खरेदी करण्यासाठी झालेल्या तुडुंब गर्दीने हे सरावलेपण वा स्विकार दाखवून दिला आहे. तेव्हा गणेशोत्सवाबरोबर पुढच्या काळही असाच माहोल राहील. आपण त्याचा आनंद घेऊ या.

अर्थातच हे करताना उत्सवातील शूचिता, स्वच्छता आणि सभ्यता राखायला हवी. या बुद्धीच्या देवतेची पूजा करताना प्रत्येक कृतीमध्ये बुद्धीचा वापर असावा. आपण करतोय ते योग्य आहे का? ते समाजाला उपकारक आहे का? त्याने समाजाला काही चांगले मिळणार आहे का? हा विचार प्रत्येक क्षणी मनात असेल तर साजरा झालेला उत्सव निश्चितच मंगलमय असेल. गणेशोत्सवामध्ये नवनव्या जाणिवांची प्राप्ती व्हावी म्हणून बुद्धी सजग ठेवण्याचा प्रयत्न व्हायला हवा. गणपती हा गणांचा अधिपती असल्याने समाजाच्या सुखदुःखाकडे दुर्लक्ष करणार नाही याची खात्री आहे. आज समाजाचे अनेक प्रश्न आहेत. नैसर्गिक आपत्ती आहे, सामाजिक भय आहे, दहशतीचा प्रश्न कळीचा ठरतो आहे. या सर्वांचे भान ठेऊन उत्सव साजरा करण्याचा प्रत्येकाचाच प्रयत्न असावा. उत्सव म्हणजे उत्+सव. यामध्ये उत् म्हणजे ईश्वर तर सव म्हणजे प्रकटणे. उत्सवाच्या रूपाने ईश्वर प्रकटतो. हे लक्षात ठेऊन प्रत्येक कृती होणे गरजेचे आहे. सध्या उत्सवाचे बाजारीकरण झालेले दिसते. हे असेच सुरू राहिले तर पुढची पिढी गणपतीलाच गणेशोत्सवाचे विघ्न दूर कर, असे साकडे घालेल. हे टाळायचे असेल तर सामाजिक प्रश्नांप्रती भान ठेऊनच या उत्सवाकडे बघणे ही काळाची गरज आहे. आपण ती लक्षात घ्यायला हवी. सध्याचे सामाजिक प्रश्न लक्षात घेता उत्सवाला प्रचारापेक्षा प्रबोधनाच्या पातळीवर नेण्याचा प्रयत्न केंद्रस्थानी असायला हवा.

गणेशोत्सवात उत्साहाचे उधाण येणे स्वाभाविक आहे. यात कोणीही मागे राहू नये. सर्वांनीच यामध्ये सामील व्हावे. गणेश बुद्धिदाता आहे, संपन्नतेचा दाता त्याच वेळी 'गणपती' म्हणजे जनदैवत आहे हे ही विसरता कामा नये. घरात पूजले जाणारे हे दैवत लोकमान्य टिळकांनी समाजात आणले. हेतू हा की, या निमित्ताने समाज एका समान श्रद्धासूत्रात बांधला जाईल. समाजमनावर एकता आणि समरसतेचा संस्कार होतील. हा हेतू मोठ्या प्रमाणात साध्य झाला आणि गणेशोत्सव हा 'वस्ती' पातळीवरील नेतृत्वाचे विद्यापीठ बनला. पण या विद्यापीठातून पुढे येणाऱ्या नेतृत्वाने समाजप्रबोधन करणे अपेक्षित आहे. त्याने समाजाला विधायक मार्ग दाखवणे गरजेचे आहे. पूजाविधीचा हादेखील एक हेतू आहे. गुणसमुच्चयाला एका मूर्तीचे रूप दिले गेले. उद्देश हा की या गुणांची पूजा करता करता ते आपल्यातही निर्माण व्हावेत. आधी म्हटल्याप्रमाणे 'उत्सव' या शब्दाचा अर्थही 'ईश्वराचे प्राकट्य!' असाच आहे. उपासकाच्या रूपात हे दैवीगुण प्रकट व्हायला हवेत, तरच खरा उत्सव केला जात आहे असे म्हणता येईल.

...पण सध्या गणेशोपासना अशी होते आहे का? हे बुद्धी देणारे दैवत असेल तर माझा प्रत्येक व्यवहार बुद्धिनिष्ठ होतो आहे का? अर्थात बुद्धिनिष्ठ म्हणजे श्रद्धाविहीन नव्हे. बुद्धी योग्यायोग्यतेची क्षमता देणारी शक्ती आहे. मी करत असलेल्या उपासनेत काही अयोग्य तर नाही ना, हे प्रत्येक पावलावर पाहिले पाहिजे. ही साधकाची सावधानता आहे. बुद्धिमान प्रत्येक क्षणी सावधच असला पाहिजे. पहिला मुद्दा आहे शुचितेचा! उत्सवासाठीचे प्रत्येक साधन शुचिर्भूत असले पाहिजे. जमा होत असलेले धन देणारा स्वेच्छने देतो आहे की धाकाने? आलेला प्रत्येक रुपया योग्य पद्धतीने, योग्य त्याच कारणासाठी खर्च होतो आहे ना? स्वेच्छेने धन देणारेही समाजाला हानीकारक गोष्टीतून पैसा कमवत नाहीत ना? ज्या वस्तूंचे उत्पादन समाजाला उपकारक नाही अशांचे आर्थिक साह्य आपण घेत नाही ना, याकडे लक्ष पुरवणे गरजेचे आहे. सावधानतेचा दुसरा पैलू अर्थातच आचरणाशी जोडलेला आहे. उत्सवाच्या जागीच नव्हे तर सर्वत्रच, उत्सवाशी जोडलेल्यांचे वर्तन योग्य आहे ना? वाजवली जाणारी गाणी, दिल्या जात असलेल्या घोषणा सभ्यतेत बसतील अशाच आहेत ना, याकडे लक्ष ठेवावे. हे भान असेल तरच बुद्धिदात्याचे पूजन यथार्थ म्हणता येईल.

सामाजिक उत्सवात संपन्नतेचा अर्थ पैशाच्या संपन्नतेशी जोडून चालणार नाही. येथे अभिरुची आणि वैचारिक संपन्नता असाच अर्थ घ्यायला हवा! सार्वजनिक उत्सवात अशी श्रीमंती नसेल तर उत्सव हा उच्छाद होऊन जातो. विशेषत्वाने गणपती हे जनाचे दैवत आहे. ते समूहाला दिशा दाखवते, सर्वांना पुरुषार्थाची प्रेरणा देते हे मान्य असेल तर प्रत्येक बाब हा हेतू सफल करणारीच असेल याची दक्षता घेतली पाहिजे. काहींना आजघडीला हा उत्सव अनावश्यक वाटू शकतो. त्याला आलेले बाजारू आणि अतिउत्सवी रूप अनेकांच्या विवेकबुद्धीला पटत नाही. व्यक्ती असो, विचार असो की उपक्रम असो, सगळ्याची एक कालसापेक्षता असते. वर्तमानाचे भान ठेऊनच या सगळ्याचा स्वीकार करणे महत्त्वाचे असते. गणेशोत्सव सार्वजनिक करण्यामागचे कारण आज संपले आहे का? प्रबोधन, परिवर्तन, प्रगती यासाठी आजचे गणेशोत्सव उपयोगी आहेत का? तर उत्तर स्पष्ट आहे, 'नाही !' मग उत्सव बंद करावेत का ? याचेही उत्तर स्पष्ट आहे, 'नाही !' मग मार्ग कोणता? तर सर्वच उत्सवांना वर्तमानानुकूल बनवणे. हे बुद्धीचे आणि वैचारिक संपन्नतेचे लक्षण ठरेल. कारण पर्यावरणाचा नाश, स्त्रियांचा सन्मान आणि सुरक्षा, राष्ट्रीय सुरक्षा, व्यसनाधीनता हे सर्वच प्रश्न आज उग्र रूप घेत आहेत. या आणि अशा समस्यांबाबत आम्ही कसे सावध होऊ शकतो, करोडोंची उलाढाल होणारे उत्सव आम्हाला जनजागृती आणि सामाजिक विवेकासाठी कसे वळवता येतील याबाबत पावले टाकायला हवीत. या उत्सवातून युवाशक्तीला नवे जग आणि नवी आव्हाने पेलण्यासाठी घडवता येईल असे उपक्रम घ्यायला पाहिजेत. दिखावा आणि देखावे यातून बाहेर पडून देखणे समाजजीवन घडवण्यासाठी या उत्सवातील ऊर्जा वापरली जावी. आता 'राज्य उत्सव' अशी मान्यता मिळालेल्या आणि वातावरणात असीम आनंद भरुन टाकणाऱ्या या गणेशोत्सवात हा विचार होत असेल, होत नसेल तर उरलेल्या दिवसांमध्ये तो केला जाईल हीच अपेक्षा.

✦✦✦

---

**गणपतीच्या पाठोपाठ घरी येणाऱ्या गौरी, त्यांचे पूजन, नैवेद्यादी विधी यांनी एक वेगळेच भारलेपण अनुभवण्याचे हे दिवस आहेत. पुढचे तीन दिवस गणपतीबरोबरच आदिमायाशक्तीच्या दोन रुपांची पूजा होईल. त्यांच्या आगमनाने घराला राऊळाचे स्वरुप प्राप्त होईल. एकंदरच हा उत्सव आध्यात्मिक आनंदाबरोबरच समाजात आचार, विचार, मूल्ये, पद्धती, अर्थकारण या सर्व अर्थाने अभिसरण घडवून आणणारा आहे. आनंदक्षणांचा हाच आढावा...**

# उत्सवाचा उत्साह सरेना

गणेशोत्सव विशेष

**माधुरी शिंदे**

गणपती आणि त्या पाठोपाठ येणाऱ्या गौरी, त्यांचे आगतस्वागत, पूजाविधीप्रित्यर्थ होणारे उपचार, नैवेद्याची रेलचेल, मंत्रोच्चाराने गजबजणारे वातावरण, कुठे संगीतमैफिली तर कुठे वक्तृत्व स्पर्धांनी, अन्य प्रकारच्या कलास्पर्धांनी उडणारी लगबग, मनोरंजनाचे कार्यक्रम साजरे करण्यासाठी केली जाणारी तयारी... अशा अनेक ना अनेक घडामोडींनी गजबजलेला हा आठवडा... नेहमीच्या साचेबद्ध शैलीतून बाहेर पडत निखळ आणि मनमुराद आनंद देणारे हे क्षण. मूर्तींमधून साक्षात ईश्वराचे सानिध्य अनुभवत असल्याची अनुभूती देणारा हा काळ... आपण सगळेच हा आनंदोत्सव, यंदाचा 'राज्य उत्सव' अनुभवत आहोत. घरोघरी होणारे ज्येष्ठागौरीचे आगमन वातावरणात आगळी प्रसन्नता पसरवत आहे.

भाद्रपद महिन्यात मूळ नक्षत्रावर येणाऱ्या या गौरी म्हणजे भारतीय स्त्रियांचा अत्यंत आवडीचा सण. गौराईबद्दल त्यांच्या ठायी अपार श्रद्धा आणि भक्ती असते. घरी येणाऱ्या गौरींना माहेरवाशिणी मानून मोठ्या प्रेमाने आणि भक्तीने स्वागत केले जाते. दुसऱ्या मुख्य दिवशी ज्येष्ठ नक्षत्रावर गौरीची महापूजा केली जाते. मोठ्या थाटामाटात गौरीचे पूजन, नैवेद्य, हळदी-कुंकू वगैरे झाल्यावर तिसऱ्या दिवशी गौरींचे विसर्जन केले जाते. घरी गौरी आणण्याची प्रथा कशी सुरु झाली याची पुराणात एक रंजक कथा आहे. हिंदू देवताशास्त्रात गौरी ही आदिमाया म्हणजेच पार्वती, शिवशक्तीचे रूप मानली गेली आहे. पुराणकाळात एकदा काही असुर सर्व स्त्रियांचा अतोनात छळ करू लागले. त्यांच्या सौभाग्याला धोका निर्माण झाला. त्यावेळी सर्व स्त्रिया आधी पार्वतीकडे गेल्या आणि संरक्षण मागून प्रार्थना केली. तेव्हा जगन्मातेने सर्वशक्तीनिशी असुरांचा वध केला आणि स्त्रियांना संरक्षण दिले. तेव्हापासून स्त्रिया तिला आई मानू लागल्या आणि अपार प्रेमापोटी, भक्तीपोटी आपल्या घरी आणू लागल्या. म्हणूनच गणपतीच्या आगमनानंतर गौरीच्या स्वरुपात माहेरवाशीण म्हणून गौरी घरी आणण्याची प्रथा पडली.

मोठी बहीण असल्यामुळे आदिमाया पार्वतीला ज्येष्ठा म्हटले जाते. येताना ती धाकटी बहीण म्हणजे विष्णूपत्नी लक्ष्मीलाही बरोबर घेऊन येते. म्हणून लक्ष्मीला कनिष्ठा म्हटले जाते. या दोन्ही देवता साक्षात लक्ष्मीचे रूप मानल्या जातात. त्या सुबत्तेचे, संपन्नतेचे वरदान देतात. गौरी आल्यानंतर पहिल्या दिवशी संध्याकाळी घरातली स्त्री लक्ष्मीचा सजवलेला मुखवटा चांदीच्या तबकात घेऊन अंगणातल्या तुळशीच्या रोपापासून मिरवत पुढे आणते. गौरी वाजत गाजत घरी येतात. ज्येष्ठा-कनिष्ठाना उंबऱ्यात ओवाळणे जाते. सोन्या रुपयांच्या पावलांनी आली आहे... असे म्हणत त्यांना घर दाखवले जाते. दुसरा दिवस मुख्य पूजेचा असतो. त्या दिवशीचा जेवणाचा पारंपरिक थाट महालक्ष्मीच्या स्वर्गीय राजवैभवाला शोभेल असाच असतो. पुरणावरणाचा स्वयंपाक असतोच पण बरोबर सोळा भाज्या, सोळा कोशिंबिरी, भजी, पापड, कुरडई, पडवळाची कढी, पंचपक्वान्न असा अन्नपूर्णेचा वरदहस्त असलेल्या स्वयंपाकाचा महानैवेद्य असतो. लाडू, करंजा, वेगवेगळ्या मिठाया, फळ फळावळं असे नानाविध पदार्थ गौरीला अर्पण करून तिचे कौतुक केलं जातं.



प्रत्येक घराण्यातल्या पारंपरिक पद्धतीप्रमाणे गौराईची वेगवेगळ्या पद्धतीने मांडणी केली जाते. कुठे सरळ हातांच्या गौरी, कुठे हातात कुंकवाचा करंडा घेतलेल्या गौरी तर कुठे गौरींचे नुसतेच पितळी तांब्यावर बसवलेले मुखवटे तर कधी धान्याच्या राशीवर बसवलेले मुखवटे दिसतात. काही ठिकाणी तर पाच बोळक्यांच्या उतरंडीलाच साडी नेसवून त्यावर गौरीचा मुखवटा ठेवला जातो. या बोळक्यांध्ये धनधान्य भरले जाते. प्रत्येक प्रांतात गौरी मांडण्याची वेगळी पद्धत दिसते. विशेषतः महाराष्ट्रात शेती हा मुख्य व्यवसाय असणाऱ्यांना गवली हे धनधान्य देणारी वरदायिनी देवता वाटते. त्यामुळे ते धान्याच्या राशीवरच गौरींचे मुखवटे बसवतात. दक्षिण भारतात प्रत्येक गावात तांदळाच्या पिठाच्या गौरीची प्रतिमा करून मखरात बसवले जाते आणि तिची मिरवणूक काढली जाते. कोकणात तेरड्याच्या रोप लक्ष्मी मानून तिची पूजा केली जाते. एकूण भारतामध्ये सगळ्या जाती-जमातींमध्ये गौराईचे आगमन अतिशय भक्तिभावाने आपापल्या पद्धतीनुसार होताना दिसते. पद्धती, प्रांत, धर्म वेगवेगळे असले तरी हा सण साजरा करण्यामागचा भक्तिभाव आणि परंपरा जोपासणे हा एक समान धागा दिसतो.

वास्तविक पाहता आज काळ बदलला आहे. विभक्त कुटुंबपद्धती सर्वमान्य झालेली दिसते. त्यामुळे कुटुंबात पूर्वीसारखा अनेक स्त्रियांचा वावर नसतो, घरात एखादीच कर्ती स्त्री असते. गौरीसारख्या सणाचा मोठा आवाका एकट्या स्त्रीला पेलणारा नसतो. त्यातून हल्ली बहुतेक स्त्रिया या अर्थार्जन करणाऱ्याही असतात. त्यांच्याकडे वेळ कमी असतो. पण गौराईवरील श्रद्धेपोटी आणि संस्कृती जपण्यासाठी सोयीस्कर मार्ग काढले आहेत. अनेक घरांमध्ये नात्यातल्या सर्व स्त्रिया एकत्र येऊन मोठ्या हौसेने गौराईचे स्वागत करतात. आताही असे स्वागतसोहळे आपण अनुभवत आहोत.

गणपती आणि गौरीच्या गजबलेल्या या काळात बाजारात कैक कोटींने वाढणारी उलाढाल आणि त्यायोगे अर्थव्यवस्थेला मिळणारी गती हादखील खरेतर अभ्यासाचा एक पूर्ण वेगळा मुद्दा आहे. या दिवसात फुलबाजारात कमळ, केवडा कणीस, शमी, सोनचाफा आणि गुलाबाला विशेष मागणी दिसून येते. त्याचबरोबर सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या फुलांचे भावही चांगलेच तेजीत असतात. जुई, कागडा, शेवंती, चांदणी या फुलांबरोबरच गुलछडी, ग्लॅडिओलस, लिलिज, डिलिया, अॅस्टर आदींनादेखील भरपूर मागणी असते. कृत्रिम फुलांपेक्षा ताज्या फुलांनी होणारी सजावट हा सध्याचा प्रचलित ट्रेंड दिसून येतोय. या दहा दिवसात केटरिंग व्यवसाय, मोदक बनवणारे लघुउद्योगदेखील वर्षभर लक्षात राहील अशी कमाई करतात यातच सगळे आले. या दिवसांमध्ये मोदकासाठी लागणाऱ्या नारळाचा भाव वाढतात त्याचबरोबर गूळाचे भावदेखील चढे राहतात. मोदकांमध्येही माव्याचे, काजूचे, ड्रायफ्रूटचे, चॉकलेटचे मोदक विशेषतः खरेदी केले जातात. सध्या बाजारात पंचखाद्याच्या तयार पॅक्सना आणि २१ मोदकांच्या बॉक्सला विशेष मागणी आहे. पौरोहित्य करणाऱ्यांची या दिवसातली व्यस्तता कोणाही आयटी कर्मचाऱ्यापेक्षा कमी नाही. महत्त्वाचे म्हणजे सध्या या व्यवसायाकडे नवतरुणवर्ग आकर्षित होत आहे. जगाने मान्य केलेल्या प्राचीन भारतीय संस्कृतीच्या मुळापर्यंत जाण्यासाठी ते महात्म्य नव्याने समजून घेण्यासाठी तरुण रक्त सिद्ध होत आहे. अशा उत्सवांच्या निमित्त त्यांच्यातील इच्छाशक्तीला हवा देण्याचे काम होते हे देखील विसरता कामा नये. तडतडणाऱ्या ढोल-ताशांचा गजर आज इंग्लंड, अमेरिकेपर्यंत पोहोचला आहे. अलिकडे ढोल-ताशांचा पारंपरिक ताल बदलतो आहे. काही पथकांकडून नवनिर्मिती करण्यात आली आहे. पाश्चात्य संगीत, लोकसंगीत, शास्त्रीय संगीताचा अनोखा मिलाफ ढोल-ताशांच्या माध्यमातून होत असल्याचे दिसून येत आहे. यातून पारंपरिकता आणि सर्जनशीलतेचा उत्तम मेळ साधला जाताना दिसतो. मिरवणुकीत चांगले वादन करून नावलौकिक मिळवण्याची इर्षा जागृत होती आहे. गणेशोत्सवातच नव्हे तर अन्य सणांनिमित्तही ही पथके कलादर्शन घडवून वेगळ्या अर्थविश्वाला आकार देत आहेत. एकंदरच कलागुणांचं होणारे चीज ही बाब नोंद घेण्याजोगी आहे.

लक्षात घेण्याजोगी आणखी एक बाब म्हणजे देशोदेशाची महाराष्ट्र मंडळे एकत्रित येऊन स्थानिक नागरिकांना सवे घेत हा उत्सव परदेशाच्या मातीत रुजवत आहेत. परिणामस्वरुप अनेक परदेशी नागरिक या उत्सवाचा आनंद लुटण्यासाठी भारताला भेट देतात म्हणजेच हा उत्सव एका विशिष्ट उद्देशाने उंबऱ्याबाहेर पडला आणि या कड्यांमध्ये गल्ली, चौक, परिसर, राज्य, देश आणि जग अशा एकेक कड्या गुंतत गेल्या. तेव्हा आजचे हे समृद्ध वर्तुळ भारताची वेगळी ओळख निर्माण करत आहे.

थोडक्यात हा काळ सगळ्यांनाच व्यस्त ठेवतो. घरातील गृहिणींपासून शिल्पकार, चित्रकार, रचनाकार, संयोजक, नर्तक-नर्तिका आदी कोणताच वर्ग यापासून दूर राहात नाही. दुसरीकडे अनेक गणेश मंडळं सामाजिक बांधिलकी जाणून काम करतात. गणपतीचे दहा दिवस एकत्र येऊन समाजबांधणीचे काम करणारा हा वर्ग नैसर्गिक आपत्तीप्रसंगी रस्त्यावर उतरतो. आपल्या परिसरात सुसह्य वातावरणनिर्मितीत त्यांचा पुढाकार असतो. गरजुंना मदत करण्यात विविध सामाजिक सेवा देण्यात ते कार्यरत दिसतात. पाणपोई सुरु करणे, अॅम्ब्युलन्सची सेवा, सार्वजनिक वाचनालय गरीब विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य, रुग्णांना उपचारात मदत अशा अनेक मार्गे ते एका जाणत्याची भूमिका बजावत आहेत. अर्थात अशा मंडळांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्यासारखी आहे, यात वाद नाही. पण ही एक जाणीव निर्माण होत असून तिचे स्वागत करायलाच हवे. गणेशोत्सवाचे हे देणे उत्सव संपल्यानंतरही कामी येणारे आहे, याबाबत दुमत नाही.

✦✦✦

# गणेशाची रुपे आगळी

**सध्या अवघे समाजमन गणेशोत्सवाच्या तयारीत गर्क आहोत. लवकरच नेहमीच्या उत्साहात गणेशाचे आगमन होईल. मात्र पूजा करताना ही देवता नेमकी कोण आहे, कालौघात तिची ओळख, स्वरूप कसे बदलत गेले, पुराणे याबद्दल काय सांगतात हेदेखील जाणून घेण्याजोगे आहे. गणपतीबाबतही अनेक संशोधकांनी संशोधन केले असून बरीच माहिती समोर आली आहे. त्या अनुषंगाने घेतलेला वेध.**

यावे गणराय

**डॉ. अंबरीष खरे**, ज्येष्ठ अभ्यासक



श्री गणेश हा विघ्नहर्ता, सुखकर्ता आहे. या स्वरूपातच आपण गणेशाचा विचार करतो. परंतु गणपतीसंदर्भातील आख्यायिका, उपलब्ध असणारी पुराणे, कथा यातून समोर येणाऱ्या माहितीनुसार ही देवता मुळात विघ्नांचा राजा असणाऱ्या 'विघ्नराज' या स्वरुपाची आहे. 'विघ्नेश्वर' हे गणपतीचे नाव सगळीकडे आलेले दिसते. शिव-पार्वतीच्या या मुलाकडे विघ्नांचे आधिपत्य दिले होते. अर्थातच यामुळे तो विघ्नांचा स्वामी झाला. असे असताना विघ्नांपासून स्वत:चा बचाव करायचा असेल तर गणेशाची प्रार्थना केली पाहिजे आणि विघ्न आणणे तसेच दूर करणे या गोष्टी त्याच्या अधीन आहेत हे ओळखून सेवा केल्यास तो तुम्हाला साह्य करू शकतो हा विचार पुढे आला.

'विनायक' हे गणपतीचे नाव अनेकदा वापरलेले दिसते. हा देखील अधिपती असणारा एक देव असून आज आपण त्याला गणेशस्वरूपातच बघतो. पण उत्तर-वैदिक साहित्याच्या उत्पत्तीकाळात, साहित्यग्रंथ तयार होताना मानवगृह्यसूत्र, अथर्ववेदीय शान्तिकल्प यासारख्या ग्रंथांमध्ये आपल्याला चार विनायकांचे वर्णन सापडते. हे विनायक लोकांना ग्रासू, झपाटू शकत असत. एखाद्याच्या मागे संकटांचा ससेमिरा लावण्याची, अहित करण्याची, मानसिक अशांती निर्माण करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये होती. म्हणजेच यांच्या प्रभावाने विद्यार्थ्यांचा विद्याभ्यास होणार नाही, वाण्याचा व्यवसाय होणार नाही, अध्यापकाला आचार्यपद मिळणार नाही असे वर्णन सापडते. अशा प्रकारे झपाटले गेलेल्या व्यक्तीला विचित्र स्वप्ने पडणे, मुंडण केलेले वा जटा वाढवलेले लोक स्वप्नात दिसणे, रस्त्यावर जाताना आपल्या पाठीमागे कोणी तरी येत असल्याचा भास होणे अशी काही लक्षणे दिसतात, अशी माहिती ग्रंथांमध्ये आहे.

यातून बाहेर पडण्यासाठी विनायकांची शांती करण्याचे सूचित केले आहे. इथे विनायकस्नपन नावाचा विधीही सांगितला आहे. यात त्यांची स्थापना करुन पूजन करणे, विविध प्रकारचे नैवेद्य दाखवणे, अग्नी प्रज्वलित करून त्यात आहुती देणे असा पूजाविधी सांगण्यात आला आहे. या चार विनायकांची नावे शालकटंकट, कूष्माण्डराजपुत्र, उस्मित आणि देवयजन अशी आहेत.

वेदांमधील 'गणानां त्वा गणपत हवामहे' या प्रसिद्ध ऋचेमध्ये 'ज्येष्ठराज' असा शब्द येतो. यावरुन 'ज्येष्ठा' नावाच्या देवतेचा प्रमुख वा तिच्याशी संबंधित असणारा असा हा गणपती आहे का, असा प्रश्न संशोधक उपस्थित करतात. 'ज्येष्ठा'चा अर्थ थोरली. ज्येष्ठागौरी आपल्याला माहीत आहे, ती अलक्ष्मीचे प्रतीक म्हणून. लक्ष्मी असते तेथे अलक्ष्मी नसते हेही आपण जाणतो. आजही गावांमध्ये 'अक्काबाईचा फेरा आला' असं म्हणतात. ही अक्काबाई म्हणजेच अलक्ष्मी. अलक्ष्मी येते आणि तुमच्याकडील धनधान्य, संपत्ती, आरोग्य घेऊन जाते, अशी एक कल्पना आपल्याकडे दिसते. थोडक्यात, या त्रासदायक देवता आहेत पण पूजा केली तर त्यांचा लोभ राहतो आणि तुमचे कल्याण होते, अशा स्वरूपाचा विचार वा देवतांचे असे स्वरूप प्राचीन काळी असावे. त्यामुळे ज्येष्ठा गौरीचे आगमनही एरवी वाईट मानल्या जाणाऱ्या मूळ नक्षत्रावर होते.

पुराण वाङ्मयाच्या पुढच्या काळातही आपल्याला गणपतीच्या कथा आढळतात. याज्ञवल्क्य स्मृतीमध्ये आधी उल्लेख केल्याप्रमाणे चार विनायक नसून ही सर्व नावे एकाच विनायकाची आहेत आणि त्याचे पूजन केले असता सर्व विघ्नांमधून मुक्ती मिळते, हा विचार समोर आलेला दिसतो. मधल्या काळात झालेला हा बदल विचारात घेण्याजोगा आहे. त्यामुळेच या काळात विघ्ने दूर करण्यासाठी विनायकाचे पूजन करण्यास सांगितले गेल्याचे दिसते. गणपतीच्या जन्माच्या गोष्टी प्राचीन ग्रंथांमधून समजतात आणि तो गजमुख असणारा देव असल्याचेही समजते. मात्र आधीच्या चार विनायकांचे सविस्तर वर्णन उपलब्ध नाही. त्यामुळेच ते गजमुख होते की नाही, त्यांचे स्वरूप नेमके कसे होते हे सांगता येत नाही. पण पुराणकथांमधून गणपतीची मूर्ती मात्र स्पष्ट होत जाते. त्याला किती हात आहेत, डोके कसे आहे, हातात कोणकोणती आयुधे आहेत हे सगळे वर्णन या कथांमध्ये केलेले दिसते. प्राचीन काळच्या गणेशमूर्ती भारतातच नव्हे, तर भारताबाहेरही सापडतात. शिव आणि ब्रह्मदेवाने त्याला गणांचा अधिपती केले आणि तो मुख्य झाला, पूजनात त्याचे अग्रमानांकन ठेवण्याची पद्धत पडली, हेदेखील पुराणांमधून समजते. विघ्न आणण्याची ताकद असणाऱ्या देवतेचे पूजन पहिल्यांदा करून त्याला शांत केले तर पुढचे कार्य चांगल्या प्रकारे पार पडेल, असा विचार त्यामागे दिसतो.

नंतरच्या काळात गणेशाचे पूजन करणारा 'गाणपत्य' हा एक संप्रदाय प्रसिद्ध झाला. आपल्याकडे पंचायतन पूजा असते. त्यात एक देवता मध्यभागी तर चारही बाजूंनी चार देवता असतात. शिव, विष्णू, सूर्य, गणेश आणि देवी (अन्नपूर्णा) अशा पाच देवतांचे यात पूजन असते. हे पूर्वापार प्रचलित होते. पण आदिशंकराचार्यांनी याचा जास्त प्रसार केला. यामागचा त्यांचा विचार महत्त्वाचा होता. तो म्हणजे तुम्ही शैव असाल तर शिव मध्यभागी ठेवा आणि उरलेल्या चार देवतांचीही पूजा करा. यातून अन्य देवतांचा द्वेष करण्याचे काही कारण नाही, हा विचार मांडला असावा. गणेशाला प्रधान मानणारे लोक गाणपत्य असतात. पंचायतनाही गणेश आहे, हे लक्षात घेण्याजोगे आहे. त्यानंतरच्या काळात गाणपत्य संप्रदायातही वेगवेगळे उपपंथ तयार झाले. खेरीज गणेशपुराण आणि मुद्गल पुराण ही दोन पुराणे गणेशाशी संबंधित असून आपल्याला माहीत असणारी बरीचशी स्तोत्र, पूजाविधी, वेगवेगळ्या आख्यायिका, कथा यांचा मुख्य स्रोत ही दोन पुराणेच आहेत.

आपल्याकडे तंत्रमार्ग होता. यातही गणपतीची उपासना केली जात असे. गणपतीचे 'एकदंत' हे एक स्वरूप आहे. दुसरा दात परशुरामाशी झालेल्या युद्धात तुटला होता. एकदंत स्वरूपातील गणेश महागणपती म्हणून ओळखला जातो. सृष्टीची निर्मिती करणारे आदितत्त्व या स्वरूपात त्याच्या या रूपाकडे काही परंपरांमध्ये पाहिले जाते. म्हणजेच ब्रह्मदेवाची निर्मितीही महागणपतीने केली, असे मानले जाते. असाच 'हरिद्रा गणपती' आहे. विशेषत: याच गणपतीची पूजा करणारा एक संप्रदाय होता. त्या काळी गणपतीचा चेहरा आणि एक दात असा एक लोखंडी ठसा तापवून तो अनुयायांच्या हातावर उमटवला जायचा. हा शिक्का ते अभिमानाने अंगावर मिरवत असत. याच प्रकारे वाममार्ग या पद्धतीनेही गणपतीची पूजा करण्याचा प्रघात होता. 'उच्छिष्ट' गणपती हे त्याचे एक स्वरूप दिसते. इथे लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे तंत्रामध्ये जातीपातीला, स्त्री-पुरुष भेदाला महत्त्व नाही. त्यामुळे सर्व लोक या उच्छिष्ट गणपतीची पूजा करत असत. त्याला मद्य, मांस, मत्स्य यांचा नैवेद्य दाखवला जात असे.

बुद्धीची देवता असूनही ऐश्वर्य प्राप्त व्हावे म्हणूनही गणपतीची पूजा केली जात असे. संपत्ती प्राप्त होण्यासाठी त्याची पूजा करण्याचे विधी सापडतात. 'संतान गणपती' पुत्रप्राप्तीच्या हेतूने पूजला जातो. यावरून गणेश ही देवता सगळीकडे प्रचलित होती, हे स्पष्ट होते. प्राचीन काळी तो विघ्नांचा अधिपती होता, पण कालौघात सुख, संपत्ती, संतान असे सर्व काही देणारा, सकलदाता असा देव ठरला. या देवतेचा सगळा प्रवास जाणून घेणे, त्याची 'सगळ्या मनोकामना पूर्ण करणारा देव' अशी ओळख बनणे हे सगळेच अभ्यासण्याजोगे आहे. भाद्रपद आणि माघ महिन्यातील चतुर्थींना गणेशाचा उत्सव मोठ्या प्रमाणात केला जातो. पार्थिव याचा अर्थ मातीपासून बनवलेला. या पार्थिव गणपतीचे पूजन विशेष करून भाद्रपदात केले जाते. मातीच्या गणपतीची पूजा हे भाद्रपदातील पूजेचे वैशिष्ट्य होय. आता हाच उत्सव आपण साजरा करणार आहोत. तेव्हा या उत्सवाची जोमाने तयारी पूर्ण करू या आणि पूजन करून गणेशाचे आशीर्वाद प्राप्त करू या!

# वैशिष्ट्यपूर्ण गणेश दर्शन

लक्षवेधी गणेश

अंतरंग

कोणतंही मंगल कार्य करण्यापूर्वी आपण श्री गणेशाची प्रार्थना करतो. 'हे गणनायका, हाती घेतलेलं काम कोणत्याही प्रकारचं विघ्न न आणता किंवा येता तडीस जाऊ दे,' हाच प्रत्येक प्रार्थनेचा आशय असतो. गणेशाच्या नावातही हाच अर्थ सामावला आहे. सुखकर्ता, दुःखहर्ता, विघ्नविनाशक मोरया हे विधान त्याचच प्रतीक आहे. गणपतीला बुद्धिची देवता मानतात. गजाननाच्या प्रार्थनेने नैतिक सामर्थ्य प्राप्त होतं. प्रत्येक आकारातील, विविध प्रकारचा, स्वरुपाचा मोरया आपल्याला आकर्षित करतो. त्याचं प्रत्येक रुप लोभस असतं.

नगरच्या ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयात स्वतंत्र गणेश दालनाची निर्मिती करण्यात आली आहे. विविध प्रकारच्या ३५० गणेशमूर्तींचं इथे एकाच वेळी दर्शन घडतं. प्रत्येकामागे दडलेली कथा निराळी, प्रत्येकाचा इतिहास वेगळा. कोणी पेशवाईशी आपलं नातं सांगतो तर कोणी ज्ञानेश्वरांचा काळ सांगतो. नाशिक येथील डॉ. विनय ठकार, डॉ. प्रतिभा ठकार, श्री. बापट, नागपूर येथील पु. शं. साठे यांनी संग्रहातील काही गणेशमूर्ती नगरच्या वस्तुसंग्रहालयाला दिल्या. संग्रहालयात वैशिष्ट्यपूर्ण अशी तांत्रिक गणेशाची मूर्ती आहे. ही मूर्ती नगर तालुक्यातील रुईछत्तीशी येथील गावकऱ्यांनी संग्रहालयाला दिली. दीड फूट रुंद आणि दोन फूट उंच असलेली ही मूर्ती दगडी चिऱ्यावर उठावाच्या पद्धतीने कोरली आहे. मूर्तीच्या पाठीशी आयताकृती चौकोन आणि त्या भागावर मूर्तीचा जो प्रत्यक्ष भाग येतो त्यावर गणेशाचा प्रणवासहित (ओमसहित) गूढ बीजमंत्र कोरला आहे. उजव्या सोंडेच्या या गणपतीच्या शरीराची रचना अक्षरलिपीत असून त्यामुळे मूर्तीचा आकार वैशिष्ट्यपूर्ण झाला आहे. या गणेशमूर्तीचे हात मोकळेच आहेत, पण पायाशी उंदीर आहे. महागणपती या तांत्रिक देव- तेचे बीजाक्षर 'ओम ग ओम' आहे. तंत्रशास्त्रातील बिंदू, कला, नाद, परिभाषिक, सांकेतिक आकृत्या या मूर्तीत स्पष्ट जाणवतात.

बाराव्या शतकातील षड्भुजा गणेशाची मूर्तीही या दालनात आहे. डोक्यावर बसलेली महादेवाची पिंड हे या मूर्तीचं वैशिष्ट्य होय. ज्ञानेश्वरीत संत ज्ञानेश्वरांनी या मूर्तीचं वर्णन केलं आहे. नगरच्या अमृतेश्वराच्या मंदिर परिसरातील पूर्वीच्या जाधववाड्यातील बाराव्या शतकातील गजाननाची मुर्ती इथे पहायला मिळते. ही नगर शहरातील पहिली गणेशमूर्ती. नवव्या









शतकातील एक फूट उंचीची मूर्ती आपलं लक्ष वेधते. डाव्या खांद्यावरून तिहेरी जानवं असलेल्या या गणरायाच्या मूर्तीचे अलंकार आदिवासी समाजातील अलंकारासारखे आहेत. घोडेगाव येथील सोळाव्या शतकातील गणेशाची दगडी शिल्पं हे या संग्रहालयाचं वैशिष्ट्य. मंगल कलशावर उभ्या असलेल्या या मूर्तीला नागाचा कंबरपट्टाही आहे.

पोवळ्यावर कोरलेली दुर्मिळ गजाननाची मूर्ती इथे आढळते. एक सेंटीमीटर उंचीची आणि आठ मिलीमीटर रुंदीची ही मूर्ती पेशवेकालीन आहे. पोवळ्यावर छन्नी चालत नाही. एका छोट्या डबीत कापसात ही मूर्ती ठेवली आहे. तांब्या, पितळ्याचे ओतकाम केलेल्या पंधरा-वीस सुखकर्त्याच्या मूर्ती तुम्ही इथेच बघू शकता. तांडवनृत्य करणारा काचेचा मोरया आपल्या डोळ्यांना भुरळ पाडतो. लाकडातून कोरलेला नवमुखी गणेश, तबला डग्गा वाजवणारा विनायक, स्फटिकात कोरलेला अभेय, मिश्र धातू, दगड शाहू, प्लास्टर, फायबर, मेण या माध्यमांद्वारे साकारलेल्या गजाननाच्या मूर्ती या दालनात आहेत. लाल-हिरव्या खड्यांपासून वॉल हँगिंग स्वरुपातील गणेश मूर्ती, निद्रिस्त गणेश, काष्ट गणेश, सुपारीत साकारलेला विघ्नविनायक, त्रिमुखी गणेश, संगमरवरी मूर्तीचा समावेशही दालनात आहे.

गणेशोत्सवाच्या काळात काही सार्वजनिक गणेश मंडळं गणेशमूर्तींचं विसर्जन न करता संग्रहालयाला भेट देतात. अशा मूर्तीही इथे आहेत. तांब्या-पितळ्याच्या ५१ हजार नागण्यातून साकारलेली भव्य मूर्ती इथे आहे. विघ्नविनायक, त्रिमुखी गणेश, संगमरवरी मूर्तीचा समावेशही या दालनात आहे.

ही नाणी चौथा राजा एडवर्ड, पाचवा जॉर्ज या काळातील. या नाण्यांचं वजन ३० किलो आहे. यात सगळ्यात अलीकडचं नाणं १९६३ मधील आहे. १८व्या शतकातील अडीच फूट उंचीचा गजानन पाहिल्यावर आपले हात नकळत जोडले जातात. गणपतीची मूर्ती कोणत्याही आकारातील, प्रकारातील असो; तिचं रुप विलोभनीय असतं. जाती, धर्माच्या सर्व भेदांना गणेशोत्सव छेद देतो आणि समाजहितासाठी हेच महत्त्वाचं!

# झगमगते अर्थकारण

आजची महागाई पाहता आपण वर्गणी म्हणून देत असलेला पैसा केवळ रोषणाई आणि सजावटीवर खर्च केला जाऊ नये अशी वर्गणीदारांची अपेक्षा असणार यात शंका नाही. पण ही अपेक्षा क्वचितच पूर्ण होते. घरगुती गणपती, सजावटीचे सामान, पुजेचे साहित्य तसेच सार्वजनिक गणपती, त्यांची सजावट, पुजेचे साहित्य असा हा खर्च, शिवाय सार्वजनिक मंडळे काही उपक्रम राबवत असतील तर त्याचाही खर्च यात समाविष्ट करायला हवा. गणेशोत्सवाच्या काळात बाजारात होणारी आर्थिक उलाढालही काहीशे कोटींची असते. सार्वजनिक गणेश मंडळांचे हिशेब वेगळे असतात. गणेशोत्सव आता राजकीय आखाडाही बनला आहे. अनेक नेते गणेशोत्सवातून आपापली ताकद आजमावत असतात, कार्यकर्त्यांना जवळ करत असतात. महानगरांमधील सार्वजनिक गणेश मंडळे काही ना काही सामाजिक उपक्रम वर्षभर राबवत असतात. पण लहान शहरे, उपनगरे, वस्ती पातळीवरील गणेश मंडळे वर्गणीतून मिळालेल्या पैशाचा विनियोग कसा करतात हा संशोधनाचा विषय आहे. अनेक वेळा एकाच वस्तीत तीन-तीन, चार-चार गणेशमंडळे असतात. वास्तविक याची गरज नसते. पण आपापसातील स्पर्धा आणि भांडणे यामुळे प्रत्येकजण स्वतंत्र गणेश मंडळ स्थापन करतो. अशा वेळी वर्गणी देणारे लोक मात्र तेच असतात. एकाच भागातील चार-चार गणेशमंडळांना वर्गणी देता देता लोकांची पुरेवाट होते. ही मंडळे मिळालेल्या वर्गणीतील साठ टक्के रक्कम सजावट, स्पीकर, मंडप आणि मिरवणुकीवर खर्च करतात. उरलेली रक्कम गणेशमूर्ती आणि पूजा यावर खर्च केली जाते. सोसायट्यांमध्येही गणपती बसवले जातात. या सोसायट्या सजावट, मिरवणूक यावर फारसा खर्च करत नाहीत. त्यांचा सगळा भर असतो तो मनोरंजनाच्या कार्यक्रमांवर.

मंडप उभारणी, प्रकाश व्यवस्था, सजावटीच्या वस्तू तयार करणाऱ्या व्यक्तींना यातून रोजगार मिळतो. गणेशोत्सव मंडळांच्या देखावे, सजावट यांच्या स्पर्धा असतात. बक्षिसाच्या आशेनेही या देखाव्यांवर आणि सजावटींवर वारेमाप खर्च केला जातो. गणेशोत्सव मंडळांचे अर्थकारण या विषयाकडे अद्याप गांभिर्याने पाहिले गेलेले नाही. पारतंत्र्याच्या काळात सामाजिक जाणिवांनी अनेक तरूण जसे पेटून उठले होते तसे चित्र आज दिसत नाही. सामाजिक कुप्रथा, भेदभाव, भ्रष्टाचार याविरोधात काही करण्यासाठी गणेशोत्सवाचा उपयोग होताना दिसत नाही.

# उत्सवात पावित्र्य हवं

सेलिब्रिटी गणेशोत्सव

**गिरीजा ओक**



आमच्याकडे दीड दिवसाचा गणपती असतो. अर्थातच सगळं साग्रसंगीत पार पाडताना भरपूर पळापळ होते. पण त्यातच खरा आनंद दडलाय. आमच्याकडे फारशी आरास करत नाहीत. सोवळ्यात गणपती असल्यानं तिथं लागालाग झालेली अजिबात चालत नाही. त्यामुळे थोडीफार फुलं आणि मोजक्या लाईटच्या माळा सोडून आरास करतो आणि गणपती बसवतो. अलीकडे तर आईकडे एक संगमरवराची मूर्ती करून घेतली आहे. आम्ही तिच मूर्ती विसर्जित करतो. म्हणजेच उपचारादाखल दोन मिनिटं पाण्यात ठेवतो आणि स्वच्छ करून पुढच्या वर्षीसाठी निगुतीनं ठेवून देतो. सासरी शाडुचीच छोटी मूर्ती असते. सोहळा पार पडल्यावर घरालगतच पाणी साठवण्याची जागा आहे. तिथे ती विसर्जित करतो.

सुरुवातीला माझ्या माहेरी गणपती बसवण्याची पद्धत नव्हती. ती कशी सुरु झाली याचीही एक गोष्ट आहे. लहान असताना वडिलांनी दहा पैशाचं नाणं गिळलं होतं. ते कळल्यावर सगळ्यांचीच घाबरगुंडी उडाली. ते आतड्यात असं काही रुतलं की ऑपरेशनशिवाय पर्याय नाही असं डॉक्टराचं मत होतं. त्या काळी साध्या इंजेक्शनलाही घाबरणारी माणसं ऑपरेशनच्या धसक्यानं गर्भगळीत झाली. आजीनं देव पाण्यात घातले आणि मुलाला वाचव, मी गणपती बसवणं सुरु करेन असा नवस बोलला. आश्चर्य म्हणजे पुढच्या दहा मिनिटातच नाणं बाहेर पडलं. तेव्हापासून घरात गणपती बसवणं सुरु झालं.

मला एक गणेशोत्सव नेहमीच आठवतो. तेव्हा गणेश चतुर्थीलाच टीव्हीवर आई रेसिपी दाखवणार होती. त्यासाठी घरी न्यूज चॅनेलवाले आले होते. एकीकडे ओट्यावर ती गडबड, दुसरीकडे घरात गणपती बसलाय ती गडबड, शुटींग बघण्यासाठी शेजाऱ्यांची गडबड. ती सर्व गडबड आजही हमखास आठवते. गणेशोत्सवात त्याच्या बदललेल्या रुपाची, त्यात आलेल्या भडकपणाची, पैशाच्या अपव्ययाची नेहमीच चर्चा होते. पण मला व्यक्तिश: यात फारसं काही वेगळं वाटत नाही. कारण आपल्या संस्कृतीतच भव्यतेला महत्व आहे. कुठलीही गोष्ट भव्यदिव्य करण्याकडेच आपला कल असतो. दिमाख आपल्याला आवडतो. एरवी वर्षभर माणसं आपापल्या व्यापात व्यस्त असतातच. या निमित्तानं ती एकत्र येतात, मन मोकळं करतात, मौजमजा करतात. तेव्हा त्यांना एवढी मोकळीक द्यायला हवी. माझ्या मते हा उत्सव माणसांनी व्यक्त होण्याचं एक माध्यम आहे.

# पेहराव देवदानवांचा

गणेश अंतरंग

अलिकडे 'ते' १३ फूट उंचीच्या विठ्ठलाचे आणि १५ फुटांच्या बकासुराचे कपडे शिवण्यात मग्न होते. देव आणि दानवांबरोबरच विविध प्राण्यांसाठी कपडे तयार करण्याचे काम ते करतात. या कल्पक कारागिराचे नाव सोमनाथ मगर. गणेशोत्सव जवळ आला की श्री. मगर यांची घाई-गडबड सुरू होते. गेली ३५ वर्षे ते आराशीच्या मूर्तींचे कपडे शिवण्याचे काम करतात. आतापर्यंत त्यांनी १७ हजारहून अधिक मूर्तींचे कपडे शिवले आहेत. आराशीचा विषय ऐतिहासिक असो, पौराणिक असो वा सामाजिक, सर्व प्रकारच्या मूर्तींचे कपडे श्री. मगर शिवतात. गणेशोत्सवाच्या आधी दीड-दोन महिने त्यांच्या कामाला सुरुवात होते.

मंडळाचे कार्यकर्ते त्यांच्याशी संपर्क साधून आराशीचा विषय सांगतात. मूर्तींची कल्पना देतात. मूर्ती ऐतिहासिक, पौराणिक देखाव्यातील असतील तर मगर जुन्या 'चांदोबा'तील चित्रे बघून, कधी इतिहासाची पुस्तके चाळून संबंधित मूर्तीची वेशभूषा व केशभूषा निश्चित करतात.

पोषाखाला लागणारे कापड ते मोठ्या शहरांमधून खरेदी करतात. कपड्यांवरचे जरीकाम, जर्दोसीकामही ते करतात. काही मूर्तींना चिलखताची गरज असेल तर तेही श्री. मगर तयार करतात. त्यासाठी चामडे वापरले जाते. या व्यतिरिक्त फर, फोमही वापरले जाते. शेळी, वाघ, लांडगा, अस्वल, गाढव आदी ६० प्राण्यांच्या मूर्तींचे कपडे त्यांनी शिवले आहेत. प्राण्यांचे कपडे म्हणजे त्यांची त्वचा असते. अशा वेळी त्या रंगाची फर मिळवण्यासाठी अनेक दुकाने पालथी घालावी लागतात. प्राण्यांचे कपडे शिवणे आव्हानात्मक असते. विविध व्यक्तिरेखांसाठी लागणारे टोप, टोप्या, जिरेटोप, गंगावन, फेटे श्री. मगर इतर ठिकाणाहून खरेदी करून मंडळाच्या कार्यकर्त्यांना देतात.



महागाई वाढल्याने कपड्यांच्या शिलाईमध्येही वाढ झाली आहे. यंदा हे दर ५० टक्क्यांनी वाढले आहेत. काही वेळा मंडळाचे कार्यकर्ते कापड, दोरा, जरीवर्कचे सामान आणून देतात. अशा वेळी श्री. मगर एका मूर्तीच्या कपड्याच्या शिलाईचे व फिटिंगचे २०० ते ५०० रुपये घेतात. हा दर मूर्तीच्या आकारावरही अवलंबून असतो. आता गणेशोत्सवाचा जल्लोष सुरू आहे. सर्वजण देखाव्यांची आणि मंडळांच्या मेहनतीची चर्चा करत आहेत. पण या गदारोळात देखाव्यांना, त्यातील पात्रांना उठाव देणाऱ्या या कलाकारांचीही आठवण ठेवायला हवी.

महासागर

# साहित्य मैफल

रविवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५ | पान ०३

# जात आणि धर्माचे खेळ कधी थांबतील?



कुठल्याही हुकुमशाही राजवटीला आपल्या जनतेला भुलवायला आणि पाठिंबा द्यायला एक शत्रु दाखवावा लागतो. आपल्या वाईटाला, आपला सुवर्णकाळ मातीत जायला हा शत्रूच कारणीभूत आहे, अशी ठाम समजूत करून दिली जाते. भारतात जे काही वाईट घडलेलं आहे, त्याला मुस्लीम जबाबदार आहेत आणि हा देश सोनेकी चिडिया होता. त्याची बरबादी व्हायला इस्लाम कारणीभूत आहे हे आपल्याला पटवून दिलेलं आहे. आता आधुनिक काळात या प्रचाराची पुढची पातळी भारतातल्या मुस्लिमांची संख्या वाढून हिंदू खतरेमे येतील ही लोणकढी थाप मारली जाते. सांख्यिकी आकडेवारीने या दाव्यातला फोलपणा कळून येईलही. मुळात भारतातल्या हिंदुनी तत्कालीन काळात इस्लाम का स्विकारला हा कळीचा मुद्दा उरतोच. धर्मांतर दोन प्रकारे होत होत. एक म्हणजे तलवारीच्या धाकाने आणि दुसरे लाभांच्या, अधिकारांच्या, सवलतींच्या अपेक्षेने. तलवारीच्या धाकाने धर्मांतर झालं अस म्हणावं तर ही इस्लाम मध्ये गेलेली मंडळी पुन्हा पवित्र वगैरे करून हिंदू धर्मात आणण्याची सोय नव्हती का ? अशी 'इनकमिंगची' सोय सोपी सुटसुटीत असती तर अनुकूल काळ आल्यावर ही मंडळी पुन्हा हिंदू होऊ शकत होती. अशी सोय उपलब्ध होती का? हिंदू धर्माने माणसांना आपल्या धर्मात येण्याची प्रक्रिया क्लिष्ट केलेली होती, म्हणून इच्छा असूनही लोक माघारी येऊ शकले नाहीत हे सत्य नाकारता येईल का? सन्मानाच्या, लाभांच्या, अधिकारपदांच्या, सवलती मिळतील, रोजगार मिळतील या अपेक्षेने स्वेच्छेने इस्लाम स्विकारलेली जनता साहजिकच भौतिक सुखांपुढे धर्म गौण मानणारी होती. म्हणूनच धर्म सोडून गेली किंवा त्यांच्या धर्मविषयक जाणीव, धर्माबद्दल असलेली आस्था आणि आपुलकी अतिशय विसविशीत होती, कमकुवत होती हाच निष्कर्ष निघतो ना? मुळात हिंदू धर्मात असलेली असमानता केवळ जन्माने तुम्ही कुठल्या जातीत, वर्णात जन्मलेले आहात त्यानुसार तुम्हाला समाजात मिळणारा सन्मान, तुमच स्थान ठरवणार असेल तर साहजिकच अस अपमानित करणारा धर्म कुणाला आपलासा वाटणार आहे? मग ज्याच्या विषयी आपलेपणाची भावना नाही तो धर्म कवटाळून बसण्यात अर्थ तरी काय आहे? असं जर कुणी म्हटलं तर तो नक्कीच देशद्रोहींच्या यादीत गणला जाईल!



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

हिंदू धर्मात असलेल्या त्रुटी दूर केल्या, तिथे समानता आली, सगळ्यांना समान हक्क मिळाले तर कोण कशाला धर्म सोडून जाईल, ही साधी बाब आपल्याला कळत नाही आणि आपण हिंदुनी धर्म सोडला हेच तथ्य इस्लामने धर्मांतर घडवून आणले अस उलट पद्धतीने मांडून खापर फोडतो.

हिंदू धमार्तून धर्म त्यागून इतर धर्म स्विकारणे थांबवण्यासाठी हिंदू धर्मातल्या खालच्या वगार्ला सन्मानाने वागवण्याची गरज आहे हे विधानच मुळात गंडलेल आहे. हिंदू धर्मात हा वरचा तो खालचा या उतरंडी नष्ट केल्या आणि सगळे एकाच पातळीवर समान झाले, समानता हा हिंदू धर्माचा गाभा झाला तर कुणाला सन्मानाने वागवण्याची गरजच भासणार नाही ना?

कुणाला तरी सन्मानाने वागवण्याची गरज आहे अस आपण म्हणतो, त्यावेळी आपण वरच्या पायरीवर आहोत आणि कुणीतरी खालच्या पायरीवर आहे हे गृहीतक मान्य करतो ना? हिंदू धर्म चांगला, निर्दोष, श्रेष्ठ असेल तर त्यातून बाहेर पडून जैन, बौद्ध, लिंगायत, शीख धर्म का स्थापन झाले?

दुसरी बाब आणि कळीचा मुद्दा म्हणजे हिंदू खतरेमे है आणि हिंदू धर्मातून इतर धर्मात जाणाऱ्या लोकांना माघारी आणलं पाहिजे किंवा थोपवल पाहिजे, अस जे म्हणतात त्यांना बेसिक प्रश्न विचारावासा वाटतो, तो असा की, समजा हिंदू धर्मातून कधीकाळी एखाद्याचे आजे पणजे मुसलमान झाले असतील आणि आता त्यांना पुन्हा हिंदू होण्यासाठी तुम्ही तयार असलात तरी त्यांना परत हिंदू होऊन मिळणारी जात कोणती असेल? त्यांना त्यांची पूर्वीची जात मिळेल की प्रमोशन होऊन नवी जात मिळेल?

हा प्रश्न विचारला की हा धर्म धर्म खेळणारी मंडळी थातुरमातुर उत्तर देऊन वेळ मारून नेतात. या सगळ्या गोष्टींचं सार फार सोप आहे. हिंदू धर्माच्या उतरंडीत वरच्या वर्गात असलेल्या लोकांना खालच्या पायरीवर असणारी लोक फक्त आपले गुलाम आणि सोल्जर्स किंवा सेवेकरी म्हणून हवे आहेत.

'हिंदू खतरेमे है' च्या नावाखाली दंगलीत राडे करायला, गोरक्षक म्हणून केसेस अंगावर घ्यायला, प्रत्येक ठिकाणी हाणामारी करायला हे सोल्जर्स हवे आहेत. मात्र या सोल्जर्सला समानतेने वागवण्याची आमची तयारी नाहीये. तुम्ही तुमच्या जन्मदत्त जातीनुसार तुमच्या पायरीनेच राहील पाहिजे आणि तुम्ही वैदिकांच्या पालखीचे भोई म्हणूनच जगल पाहिजे एवढाच सोपा अर्थ.

ही समानता जोवर हिंदू धर्म स्विकारत नाही, तोवर 'हिंदू खतरेमे है' या भंपकपणाला काहीही अर्थ नाही. अलिकडच्या काळातील काही उदाहरणं डोळ्यासमोर आहेत. कोल्हापूर, नाशिक, यवत, विशाळगड, सांगली किंवा आणखी तत्सम कोणत्याही गावात दंगली झाल्यावर ज्यांच्या अंगावर खटले पडलेत, ज्यांना जामिनासाठी आईबापाला खेटे घालून डाग मोडावे लागलेत, ज्यांना सणवार आला की पोलीस स्टेशनात हजेरी द्यावी लागतीय, अश्या सगळ्या तथाकथित धर्मरक्षक बहुजनांनी काही गोष्टींचा अभ्यास केला पाहिजे.

धर्म रक्षणासाठी ज्यांचा आदेश येताच बहुजनांचे तरुण रस्त्यावर येतात आणि बरबाद होतात, त्यांनी आपल्या आजूबाजूला नेमके काय चालले आहे याचा अभ्यास केला पाहिजे. पण तो अभ्यास न करता धर्म संकटात सापडल्याचे समजून तो जी कृती करतो, ती त्याला आयुष्यभर पश्चाताप करायला लावते. परंतु तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते.

बीसीसीआयच्या माध्यमातून अमित शहांचा मुलगा विविध देशांमध्ये हजेरी लावतो, त्यावेळी आपले अनेक तरुण धर्मरक्षणासाठी लढाई करीत असतात. जरा बारकाईने आजूबाजूला नजर टाकल्यावर या तरुणांची झोप उडाली तर ठीक, अन्यथा जे काही चालू आहे ते चालूच राहील. शिवराज सिंह चौहान उर्फ मामाजींचा मुलगा कार्तिकेयने अमेरिकेच्या पेनसिल्वेनिया यूनिवर्सिटीतून एलएलएम पदवी संपादन केली. त्यामुळे त्याच्या जीवनाची पुढची वाटचाल सांगायला ज्योतिषाची गरज नाही.

केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांचा मुलगा ब्रिटनच्या लीडस् युनिव्हर्सिटी मधून एमबीए करीत आहे. ही व्यावसायिक पदवी एकदा मिळाली की त्याच्या करिअरची कुठलीही चिंता राजनाथ सिंह यांना राहणार नाही. महाराष्ट्राचे म्हणावे की गुजरातचे म्हणावे याबाबत मतभेद असले तरी केंद्रीय मंत्री पियूष गोयलची मुलगी आणि मुलगा हॉवर्डमध्ये शिकून इनव्हेस्टमेंट बँकर बनली आहेत.

रविशंकर प्रसाद यांचा मुलगा आदित्य शंकर अमेरिकेतील न्यूयॉर्कच्या कॉर्नेल यूनिवर्सिटीमधून कायद्याचं शिक्षण घेऊन वकिली करतोय. पण दंगलीत सहभागी झालेल्या तरुणांचे वकीलपत्र तो फुकट कशाला घेईल? निर्मला सीतारामनची मुलगी वांग्मयी अमेरिकेच्या नॉर्थवेस्टर्न यूनिवर्सिटीमधून मास्टर्स झाली.

एस. जयशंकरचा मुलगा ध्रुव अमेरिकेच्या जॉर्जटाउन यूनिवर्सिटी मधून मास्टर्स, आणि मुलगी मेधा डेनिसन युनिव्हर्सिटी मधून स्नातक आहे. ज्योतिरादित्य सिंधियांचा मुलगा महाआर्यमन येल युनिव्हर्सिटीमध्ये शिकला. हर्षवर्धनचा मुलगा सचिन मेलबर्न युनिव्हर्सिटीत फायनान्स आणि अकाउंट्स विषयात उच्च शिक्षण घेतोय. जितेंद्र सिंहचा मुलगा अरुणोदय ऑक्सफर्ड मधे शिकतोय. अनिल बोंडेंचा मुलगा अमेरिकेत डॉक्टर होऊन तिकडेच आंतरजातीय लग्न करून स्थायिक झालाय.

यादी बरीच मोठी आहे. जहाल हिंदुत्वाचे पुरस्कर्ते व नथुराम गोडसे फेम शरद पोंक्षेची कन्या कुठे काय करते हेदेखील महाराष्ट्राला माहित आहे व ते अलीकडच्या काळातील सर्वात ताजं उदाहरण आहे. तुमची लेकरं काय करत आहेत? हिंदु, मुस्लिम, दलीत, दंगे, जाळपोळ, कोर्टाच्या तारखा आदींमध्ये व्यस्त आहेत. मग कशाला गळे काढायचे आम्हाला वापरून घेतलं म्हणून ?

### संपवला मराठी माणूस या राजकारण्यांनी?

'मी मुंबईकर' मराठी आहे, याचा आपल्याला अभिमान जरूर आहे. पण? मी आजारी पडलो तर माझी पसंती रिलायन्स हॉस्पिटलला आहे, ते गुजरात्याचं आहे. माझं आवडतं हॉटेल ताज आहे. ते पारशी माणसाचं आहे. मी 'टाइम्स ऑफ इंडिया' वाचतो जो जैन या मारवाड्याचा आहे. लोकसत्ता गोएंका शेठचा आहे. लोकमत दर्डा नावाच्या मारवाड्याचा आहे. मी झी मराठी पाहतो, तो सुभाषचंद्र या सिंध्याचा आहे. मला न्यूज १८ लोकमत आवडतं, ते गुजरात्याचं आहे. माझ्या खिशातला मोबाईल जीओचा म्हणजेच गुजरात्याचा आहे. मी घर शाह नावाच्या बिल्डरकडून घेतलंय, जो मारवाडी आहे. मी ज्याच्या रिक्षाने स्टेशनवर जातो, ती शर्मा नावाच्या भैयाची आहे. मी जिथे चहा पितो तो ठेला अण्णा नावाच्या तामिळीचा आहे. ज्या मेट्रोने फिरतो ती गुजरात्यांच्या पैशाची आहे. वीज अदानी आणि टाटांची आहे. विमानं पारशी माणसाचं आहे. काम करतो त्या कंपनीचा मालक पंजाबी आहे. इडली खातो तो कामत उडपी आहे. संध्याकाळी दोन पेग मारतो ते हॉटेल शेट्टी माणसाचं आहे. बेकरीवाला अय्यंगार, दूधवाला मारवाडी, फर्निचरवाला मारवाडी, किराणावाला मारवाडी, कपडेवाला सिंधी, चिकनवाला उत्तर भारतीय आहे. फक्त मी ज्या भिकार राजकारणाच्या गप्पा हाणतो, ते राजकारणी तेवढे मराठी आहेत. संपवला मराठी माणूस या राजकारण्यांनी आणि स्वतःच्या मी पणातच संपला. कटू आहे पण सत्य आहे.

# तीन तिघाडा..!



रायगडमधली सगळी कामं आटवून मी सिद्धार्थ जाधव नावाच्या माज्या कॉलेज मित्राच्या घरी जेवण केलं. मुंबईमधल्या माणसाला कोणाच्या घरी जाऊन जेवायचं म्हटलं की जरा अडखळल्यासारखं वाटतंच. आणि ते जेवण जर एखाद्या गावच्या ठेवणीत आईच्या स्पर्शाने बनवलं असेल, तर त्याची मजा काही औरच. सिद्धार्थ आणि मी तसे नांदेड जिल्ह्यातले. त्याच्या आईची जुनी ओळख, मग काय – आईने पक्का मराठवाडी जेवणाचा बेत आखला आणि जोरदार जेवण झाले.

जेवण झाल्यावर मी पुढच्या रस्त्याला निघालो. गाडी सुरू होती. मी माज्या लॅपटॉपवर माझीच प्रेमसेतू नावाची कादंबरी वाचत होतो. बराच वेळ प्रवास झाल्यावर फणसाड अभयारण्य असा बोर्ड वाचायला मिळाला. पुढे मुरुड-जंजिरा आणि रोहे अशी शहरे आसपास असल्याचं फलकावरून जाणवलं. त्या रस्त्यावर मध्ये येणारी माणसं – जंगलातून रस्त्यावर प्रवास करणारी माणसं; कोणी फळं विकत होतं, कोणी लाकडं वाहत होतं, कुणी गुरेढोरे चारण्यासाठी जंगलामध्ये ये-जा करत होतं.

जंगलाच्या आतमध्ये थोडं पुढे गेल्यावर माणसांची वर्दळ जरा कमी झाली. एका वाहणाऱ्या शांत आणि निरागस झऱ्यावर माझी नजर गेली. तिथे प्रचंड शांतता होती. आसपास असणारं वातावरण मनाला मोहिनी घालत होतं. मी सगळीकडे पाहिलं, आसपास कोणीही नव्हतं. कदाचित म्हणूनच इथल्या वातावरणामध्ये एक वेगळी शांतता होती.

माझ्यासोबत असलेला शंकर नावाचा माझा चालक मला म्हणाला, साहेब, तुम्ही त्या झऱ्याकडे पाहत आहात; पण त्याच्या थोडं पलीकडे पहा. मी पाहिलं तर एका बाजूला दोन-चार मोर एका झाडाखाली बागडत होते. त्या मोरांच्या पलीकडे, दोन छोटे-छोटे हरणाची पिल्लं पाणी पिण्यासाठी पाऊलवाटेने पाण्याच्या दिशेने जात होती. आम्ही गाडीचा आवाज न करता शांतपणे तिथेच थांबलो होतो.

असं वाटत होतं की माणसाने त्या सगळ्या प्राण्यांच्या विश्वावर प्रचंड अतिक्रमण केलं आहे. बिचाऱ्या प्राण्यांना माणसाने कुठेच सोडलेलं नाही.

माझ्या चालकाने मानेखालची शीट लांब केली आणि त्या लिंबाच्या झाडाखाली रस्त्यावर शांतपणे त्या शीटवर पडला.

सिद्धार्थच्या आईचं जेवण त्याच्या अंगाला लागलं होतं, हे माझ्या लक्षात आलं. मी लॅपटॉप आवरला आणि चालकाला आवाज देत म्हणालो, ह्लअरे, मी जरा आलोच.ह्ल ड्रायव्हरने लावलेले डोळे थोडेसे उघडले आणि माज्याकडे पाहिलं. मी गेल्याची खात्री करून तो अजून शांततेत पडून राहिला.

मला दुरून दिसणाऱ्या त्या झऱ्यापर्यंत मी चालत गेलो. मी जाईपर्यंत त्या हरणांचं पाणी पिणं झालं होतं. माज्या पावलांच्या चाहुलीने ते मोर केव्हाच पळाले होते. आता मी तिथली शांतता आणि ते पाण्याचे वाहणारे झरे – अशा आमच्यातच न बोलताही गप्पा सुरू होत्या. मी बूट काढले आणि शांतपणे त्या पाण्यात पाय सोडून बसलो.

त्या जागेवर खऱ्या अर्थाने सांगायचं तर शांत जगाची चाहूल लागली होती – म्हणजे माणसं नाहीत, वाहनांची जवळजवळ ये-जा नाही, मोबाईलला रेंज नाही, कोणाचं बंधन नाही, कुठल्या फॅक्टरीचा किंवा विमानाचा आवाज नाही.

मला असं वाटलं होतं की थोडा वेळ झाल्यावर माझा चालक मला शोधत-शोधत तिकडे येईल आणि म्हणेल, ह्लचला, उशीर झाला; पण तो कशाचा येतोय! शांत ठिकाणी आणि लिंबाच्या झाडाखाली त्याला लागलेली झोप अधिकच गाढ स्वरूपाची होती, हे त्याच्या न येण्यामुळे मी समजून गेलो.

पुढच्या प्रवासाला लागावं, या हेतूने मी उठणार तितक्यात दोन महिला आणि एक मुलगी डोक्यावर लाकडांच्या मोठ्या मुळ्या घेऊन येताना मी पाहिल्या. त्या तिन्ही माझ्या अगदी जवळ आल्या.

भ्रमंती लाईव्ह स्टोरी

संदीप काळे
sandip98868@gmail.com
9890098868

त्यांनी अलगदपणे त्या लाकडाच्या मुळ्या खाली ठेवल्या आणि मी ज्या ठिकाणी पाय सोडून बसलो होतो त्या झऱ्याचं पाणी गटागट पिऊ लागल्या. पाणी प्यायल्यावर त्यांचा थकलेला चेहरा एकदम प्रसन्न झाला.

त्या सुनसान जागी, जिथे सगळीकडे सावधान असे बोर्ड लावलेले होते, जिथे माणसांचा-पक्ष्यांचा फारसा थारा नव्हता, तिथे या दोन महिला आणि एक मुलगी एवढ्या जड लाकडं घेऊन कुठे जात असतील? हे रोजचं त्यांचं काम असेल का? यांना इथल्या हिंस्र प्राण्यांची भीती वाटत नसेल का? असे प्रश्न माझ्या मनात आले.

मी त्यांना बोलावं का, आणि बोलल्यावर त्यांना आवडेल का, हा प्रश्नही मनात आला. पण मी संकोच न ठेवता मोठ्याने आवाज दिला... ताई, हे पाणी काय पाईपलाईनचं आहे का?

मी ज्यांना प्रश्न विचारला, त्या बाईने दुसऱ्या बाईच्या चेहऱ्याकडे पाहिलं, पदरानं चेहरा पुसला आणि हसत म्हणाली, दादा, हे जंगलातून येणारं पाणी आहे. इथे कुठली पाईपलाईन आली आहे? मी विचारलं, बारा महिने पाणी असतं का? ती म्हणाली, हो, इथे नेहमी पाणी असतं.

मी विचारलं, तुम्ही कुठे राहता? हे ऐकल्यावर तिचा सूर थोडा आवरलेला झाला, बाजूलाच राहतो, एवढंच उत्तर दिलं. मी म्हणालो, बरं ताई, ठीक आहे, मी निघतो. त्यावर ती म्हणाली, दादा, जरासा हात लावाल का, ही लाकडं उचलायला?

मी हसलो, हो का नाही, नक्की.

पण तिनं लगेच म्हटलं, असू द्या, दादा. आम्ही थोडं खातो, थोडा वेळ बसतो, मग निघतो. मी हो म्हणून मान हलवली. तिने पिशवीतून भाकरी काढली. त्या खात होत्या. त्या दोन मोठ्या महिलांना मला बोलायला संकोच वाटत होता, पण धाकटी मुलगी मोकळेपणाने बोलत होती.

ती म्हणाली, दादा, तुम्ही आमच्या सरांसारखे दिसता. तुम्ही पण शिक्षक आहात का?

मी हसत उत्तर दिलं, नाही, मी पुस्तकं लिहितो, लेखक आहे. ती म्हणाली, थोडं खाल का भाकरी? मी म्हणालो, नको, मी आत्ताच जेवलो. ते ऐकून दुसरी महिला म्हणाली, अगं, एवढे मोठे माणसं आहेत, तुझा चटणी-भाकरीचा तुकडा खातील का?

हे ऐकून मुलीचा चेहरा पडला.

---------------

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

# उत्सवांना विधायक वळण द्या..







लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी ज्या हेतूने गणेशोत्सव, शिवजयंती असे उत्सव सुरू केले त्याच्यामागे फार मोठी भूमिका होती आणि विचार होता. काळानुसार उत्सवाचे स्वरूप बदलले हे मात्र नक्की. कार्यक्रमातून उत्सवामधून जे काही फलित व्हायला हवे ते होत नाही.

अनेक ठिकाणी गणेशोत्सवात रस्त्यामधून मंडप टाकले जातात वाहतुकीला अडथळ्याचे ठरतात. उत्सवाची वर्गणी मागण्यासाठी बऱ्याच वेळा जबरदस्ती केली जाते मिरवणुकीमध्ये डीजेचा डॉल्बीचा लेझर किरणांचा वापर केला जातो आरोग्य दृष्टीने ते घातक असते. आंधळेपणा, बहिरेपणा, उच्चदाब असणाऱ्यांना बऱ्याच वेळा धोका झालेला आहे . काही प्रकरणात तर मृत्यू ओढवलेला आहे.



मिरवणुकीमध्ये बऱ्याच ठिकाणी मद्यपान करून दिवसभर अर्थहीन गाण्यावर नाच केला जातो, सर्वच ठिकाणी सारखी परिस्थिती असते असे नाही. काही मंडळांमध्ये अतिशय शिस्तबद्ध पणे आरती केली जाते आणि कार्यक्रमाची आखणी केली जात असते. परंतु अशा मंडळांची संख्या फारच कमी असते. हे प्रमाण ८०/ २०% असे असते अनेक ठिकाणी चांगल्या कार्यक्रमाचे आयोजनही केलेले असते.

गेल्या काही वर्षांमध्ये अशा उत्सवामध्ये राजकारणी नेत्यांचा प्रवेश झाल्यामुळे उत्सवाचे स्वरूपच पालटले आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात देणग्या मिळतात त्यामुळे वेगळ्या प्रकाराने कार्यक्रमाचे आयोजन होते. त्यात त्यांचाही सहभाग असतो. त्यामुळे अशा कार्यक्रमा नियमाचे बंधन पाळले जात नाही आणि अधिकारी असहाय्य असतात.

होणाऱ्या त्रासामुळे मात्र बऱ्याच वेळा जनता नाराज असते. आणि म्हणूनच मग उद्विग्न अवस्थेतून संतापाने बंद करा हा गणेशोत्सव अशा प्रतिक्रिया काही जणांकडून उमटतात. अर्थातच असे आपले धार्मिक उत्सव बंद होणे शक्य नाहीच फक्त त्यात काही सुधारणा आणि विधायक कार्य होणे अपेक्षित आहे.



दिलीप देशपांडे
जामनेर. जि.जळगांव.
८९९९५६६९१७
dilipdeshpande24
@gmail.com

गणेशोत्सव म्हणजे आनंद आणि चैतन्याचा उत्सव असतो आणि उत्साह ही असतो. गणपतीला विद्येची देवता, चौसष्ट कलांचा अधिपती आणि विघ्नहर्ता, संकट विमोचक म्हणतात. आपण कुठल्याही कार्याची सुरुवात करताना श्री गणपतीचे पूजन करतो आपले कार्य निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी प्रार्थना श्री गणपती समोर करतो.

*गणपती माझा नाचत आला,*
*गणपती बाप्पा आले घरा,*
*घराचे मंदिर झाले.. बघा....*

असे म्हणत आपण घरोघरी शोडपचारे पूजा करून गणपतीची स्थापना करीत असतो. मोदकांचा नैवेद्य दाखवत असतो.

महाराष्ट्रात गणेशोत्सवाला सुरुवात पेशव्यांचे काळात झाली. भाद्रपद शुद्ध चतुर्थी पासून दशमी पर्यंत सात दिवस हा उत्सव होत होता. गणेश उत्सवाला सामाजिक आणि सार्वजनिक स्वरूप १८९३ सालापासून मिळाले. त्यावेळी लोक जागृतीचे एक मुख्य साधन म्हणून प्रबोधनाचे स्वरूप दिले.

लोकमान्य टिळकांनी समाजात एक्याची भावना वाढावी या हेतूने गणेशोत्सवाची त्यासाठी निवड केली आणि त्यावेळी हा उत्सव गणेश चतुर्थी पासून ते अनंत चतुर्दशी पर्यंत असा दहा दिवस सुरू करण्यात आला. त्यावेळच्या परिस्थितीत सर्व समाजाला एकत्र करावे आणि राष्ट्रीय अस्मिता जागृत करावी हा त्यामागचा मोठा उद्देश होता. अर्थातच स्वातंत्र्य आंदोलनात सार्वजनिक गणेशोत्सवात जे लोक जागृती कार्य केले ते उल्लेखनीय आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात पुण्यात झाली आणि हळूहळू तो संपूर्ण महाराष्ट्रात साजरा होऊ लागला. राजकीय व्यक्तिंच्या प्रवेशामुळे, पाठबळामुळे उत्सवांना वेगळे स्वरूप प्राप्त होत आहे हे सत्य नाकारता येणार नाही. कारण राजकीय व्यक्तींकडून आपला राजकीय हेतू साध्य करण्यासाठी अशा मंडळांना मोठ्या मोठ्या देणग्या देऊन आकृष्ट केले जाते. परिणामी हा पैसा योग्य कामी खर्च न होता फक्त डी. जे, रोशणाई, मोठ मोठ्या मूर्ती आणि इतर अनेक कारणासाठी खर्च होतो,

फार कमी मंडळाकडून विधायक कामे होतात. गणेश मंडळात असणारी बहुसंख्य मंडळी ही तरुणच असते आणि अशावेळी त्या मंडळाकडून होणाऱ्या कार्यक्रमाला विधायक स्वरूप कसे प्राप्त होईल, सामाजिक ऐक्य कसे टिकून राहील, पर्यावरणाचा विचार कसा केला जाईल किंवा प्रदूषण निर्माण होणार नाही याची दखल घ्यायला हवी.

उत्सवात पूजेसाठी मातीची मूर्ती असावी असे उल्लेख आहेत. आणि संकल्पात सुद्धा

*मृण्मय पार्थिव महागणपती पूजनं करिष्ये..*

असे म्हणण्याचा प्रघात आहे .कारण कर्मकांडातील बहुतेक पूजा ह्या विशेष कालावधीनंतर विसर्जित केल्या जात असतात, म्हणूनच घरात आणली जाणारी गणपतीची मूर्ती ही आपल्याला स्वतःला आणता येईल एवढे असावी, अनेक ठिकाणी महापालिकांनी पी.ओ.पी. गणेश मूर्तीवर बंदी आणलेली आहे. प्रदूषण महामंडळा कडून त्याविषयी आदेश काढले जातात.

गणेशोत्सव हा तर महाराष्ट्रातला सगळ्यांचा आवडता आणि मोठा उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.

सध्याच्या परिस्थितीत ह्या उत्सवाचे स्वरूप खूप बदलले आहे. धार्मिकते पेक्षा ईतर गोष्टींना महत्व दिले जाते. मोठया मूर्ती, देखावे झगमगाट, रोषणाई, डी. जे. च्या तालावर कर्कष्य गाणी, हे प्रमाण वाढले आहे. बाजारात सिंगल यूज प्लास्टिक मध्ये सजावटीच्या प्लास्टिकच्या फुलांचा समावेश नसल्याने बाजारपेठेत सर्रास विकले जातात.

लोकमान्य टिळकांनी ज्या विचारांनी घरातल्या गणपती बरोबरीने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात केली, त्याचा जवळपास विसर पडल्या सारखा झाला आहे. अगदीच तुरळक मंडळात गणपती अथर्वशीर्षाचे पठण होते. पुण्यामध्ये हजारोंच्या संख्येने महिला ऋषिपंचमीला दगडूशेठ गणपती समोर अथर्वशीर्षाचे पठण करतात. काही ठिकाणी अथर्वशीर्ष पठणाच्या स्पर्धा घेतल्या जातात.

काही वषार्पूर्वी गणेश व्याख्यानमाला सारखे उपक्रम केले जात होते. निरनिराळ्या विषयावरचे विचार ऐकायला मिळायचे. देखावे, रोषणाई, तर करावीच पण ह्या गोष्टीलाही प्राधान्य होते. आता काही ठराविक ठिकाणीच असे व्याख्यानमालाचे कार्यक्रम आयोजित केले जातात अथर्वशीर्ष पठण स्पर्धा घेतल्या जातात.

डी. जे. च्या कर्कष्य तालावर जी गाणी लावली जातात,तो प्रकार कुठेतरी थांबावा असे वाटते. उत्सव साजरा करण्यातूनच आनंद, समाधान, जरुर मिळायला हवे पण त्यापासून कोणाला त्रास होणार नाही हा विचारही असायला हवा. म्हणूनच हा उत्सव साजरा केला जातो उत्सवा मागचे खरे धार्मिक, सांस्कृतिक, प्रबोधन महत्वाचे विषयांचा, उद्देशाचाही विसर पडायला नको.

उत्सव साजरा करताना जर आपण काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर त्या उत्सवाचे हेतू आणि पावित्र कायम राहील .गणेश मूर्ती निवडताना ती शाडूच्या मातीची किंवा इको फ्रेंडली असावी. प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा थर्मोकोलची नसावी. मूर्तीची उंची प्रमाणात असावी.

उत्सवात आकर्षक पण कमी वीज लागणारी रोषणाई केली तर विजेची बचतही होते.

आरास करतानाही ती पर्यावरण पूरक तसेच आरोग्यासाठी हानिकारक ठरणार नाही असेच रंग वापरावे.

सरकारने बंदी आणलेल्या प्लास्टिकचा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

उत्सवाचे काळात आपल्या उत्साहामुळे म्हणजेच डी. जे लाउड स्पीकर याच्या वापरामुळे आजूबाजूच्या परिसरातील दवाखाने, शाळा, यांना त्रास होणार नाही हे बघायला हवे. रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही ही काळजी हवी.

मूर्ती विसर्जनाच्या वेळी ठीक ठिकाणी तात्पुरते तळे किंवा तलाव त्या त्या ग्रामपंचायत नगरपालिका यांनी उपलब्ध करून द्यावे.

अपप्रकार घडणार नाही अपप्रवृत्तीचा शिरकाव होणार नाही याची काळजी मंडळाचे कार्यकर्त्यांनी घ्यावी.

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या सार्वजनिकतेत जो सांस्कृतिक वैभवचा ठेवा दिला आहे त्या निमित्ताने या उत्सवात सर्वांनी एकत्र यावे, विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे व्हावे, स्पर्धा व्हाव्यात एकमेकात बंधूभाव, देशप्रेम निर्माण व्हावे आणि गणेशोत्सवाचे पावित्र्य कायम ठेवून लोकसंस्कार व्हावे तरच गणेशोत्सव साजरा करण्याचा हेतू साध्य होईल.

सगळे सण, उत्सव साजरे करत असताना सामाजिक भान ठेवायला हवे. आपल्या संस्कृतीला शोभेल असेच धार्मिक आणि विधायक कार्यक्रम आखून उत्सव साजरे व्हावेत.

अशा प्रकारचे उत्सव, सण, हा सर्व आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे. ठिकठिकाणी गणपती मंडळांनी या गोष्टीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. आता शासनाने गणेशोत्सवाला राज्याचा उत्सव म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. त्या दृष्टीने त्यांनी आखून दिलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. राजकीय नेत्यांचा कार्यक्रमास सहभाग असला तरी त्यामुळे कार्यक्रमाचे स्वरूप बिघडणार नाही याची दक्षता घ्यायला हवी.

राज्य उत्सव म्हणून जिल्ह्या जिल्ह्यात उत्कृष्ट विधायक कार्य करणाऱ्या, देखावे सादर करणाऱ्या, आणि नियमांचे पालन करणाऱ्या मंडळांना बक्षिसे जाहीर करून त्यांचा सत्कार करावा त्या निमित्ताने उत्कृष्ट कार्य करण्याची मंडळांमध्ये चढाओढ लागून मंडळाच्या कामात शिस्त निर्माण होईल. अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

***मोरया.. मोरया.. बोला गणपती बाप्पा मोरया..***

# ‘हैवान’मध्ये सैयामीची हवा



तब्बल १७ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर सुपरस्टार अक्षय कुमार आणि सैफ अली खानची जोडी दिग्दर्शक प्रियदर्शन यांच्या ‘हैवान’ या चित्रपटाद्वारे पुनरागमन करणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू झाले असून त्यासंबंधीचे अपडेट दिग्दर्शकाने स्वतः दिले आहेत. त्याचप्रमाणे एका प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्रीने ‘हैवान’मध्ये प्रवेश केला असल्याची बातमीही चर्चेत आहे.

‘हैवान’ हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रतीक्षित चित्रपटांपैकी एक आहे. ‘भूत बांगला’ आणि ‘हेरा फेरी ३’ नंतर दिग्दर्शक प्रियदर्शन यांचा हा हॉरर थ्रिलर थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. ताजी अपडेटनुसार ‘हैवान’मध्ये प्रवेश करणारी अभिनेत्री बऱ्याच काळापासून इंडस्ट्रीवर राज्य गाजवणारी असून तिचे नाव सैयामी खेर आहे. हो... सैयामी लवकरच हैवानमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसणार आहे. सैफ अली खान आणि अक्षय कुमार यांच्यासारख्या मोठ्या कलाकारांसोबत ती पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करणार आहे. या वर्षाच्या सुरुवातीला ती सनी देओलच्या ॲक्शन थ्रिलर ‘जाट’ मध्ये दिसली होती. त्यात तिने महिला पोलिस निरीक्षक विजय लक्ष्मीची भूमिका साकारली होती. इतकेच नाही तर ती अभिषेक बच्चनसोबत ‘घूमर’मध्येही दिसली आहे. असे असताना आता ‘हैवान’ तिच्या अभिनय कारकिर्दीसाठी एक मोठा ब्रेक मानला जात आहे. सैयामी खेर व्यतिरिक्त आणखी एक अभिनेत्रीही ‘हैवान’चा भाग बनू शकत असल्याचे सांगितले जात आहे.

सैयामी खेरच्या एन्ट्रीनंतर ‘हैवान’ एका मल्टीस्टारर स्वरुपात दिसणार असल्याचे उघड झाले आहे. त्यात अक्षय कुमार, सैफ अली खान आणि सैयामी खेर व्यतिरिक्त ज्येष्ठ अभिनेता असरानी देखील महत्त्वाची भूमिका साकारताना दिसतील. हा चित्रपट २०२७ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित होऊ शकतो.

# पोस्ट काय सांगते?



जय दत्तची मुलगी त्रिशाला दत्तने कुटुंब आणि मानसिक आरोग्यावर एक गर्भित पोस्ट करून सोशल मीडियावर एकच खळबळ उडवून दिली आहे. संजयला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्यानंतर काही दिवसांनीच त्रिशालाने इंस्टाग्रामवर एक लांबलचक पोस्ट शेअर केली ज्यामध्ये तिने कुटुंबाबद्दल बरेच काही लिहिले. ते पाहून चाहत्यांमध्ये संजय दत्तच्या घरी सर्व काही ठीक आहे की नाही हे जाणून घेण्याची उत्सुकता वाढली आहे.

पोस्टमध्ये त्रिशालाने लिहिले आहे की, ‘आयुष्यात रक्ताच्या प्रत्येक नात्याला स्थान मिळायला हवे असे नाही. बरेचदा आपल्याला माहीत असणाऱ्या आणि सर्वात थकवणाऱ्या लोकांनाही ‘कुटुंब’ म्हटले जाते. पण तुम्हाला शांतता राखण्याचे स्वातंत्र्य आहे. कमी संपर्क साधण्याचे किंवा अजिबात संपर्क न करण्याचे स्वातंत्र्यही आहे. मुख्य म्हणजे कुटुंबाची प्रतिमा राखण्यापेक्षा स्वत:चे मानसिक आरोग्य निवडण्याचा अधिकार आहे’. तिने पुढे लिहिले, ‘कारण ‘कुटुंब’ तुम्हाला स्वतःला गैरवापर टाळण्याची, हाताळण्याची किंवा दोष नाकारण्याची मोकळीक देत नाही. म्हणूनच तुम्हाला दुखावत राहणाऱ्या व्यक्तीशी सतत संपर्क साधण्याची गरज नाही. मग त्यांनी तुम्हाला वाढवले असले तरीही... बऱ्याच पालकांना कुटुंब कसे दिसते याची जास्त काळजी असते. मुले कशी जगतात याकडे ते बघत नाहीत. तेव्हा ही एक मोठी समस्या आहे’.

त्रिशालाने या पोस्टमध्ये कोणाचेही नाव घेतले नसले तरी, त्यामुळे वडील संजय दत्त यांच्याशी असणाऱ्या तिच्या नात्याबद्दलच्या संबंधांना लगेचच उधाण आले.

संजय दत्त आणि पहिली पत्नी रिचा शर्मा यांची मुलगी त्रिशा. तिचा जन्म १९८८ मध्ये झाला. तिने लहानपणीच आईला गमावले. रिचाचे १९९६ मध्ये ब्रेन ट्यूमरमुळे निधन झाले. सध्या त्रिशाला बॉलिवूडपासून दूर अमेरिकेत राहते. ती मानसोपचारतज्ज्ञ आहे.

संजय दत्तने २००८ मध्ये अभिनेत्री मान्यता दत्तशी लग्न केले. या जोडप्याने २०१० मध्ये शाहरान आणि इकरा या जुळ्या मुलांचे स्वागत केले. त्रिशाला, शाहरान आणि इकरा अधूनमधून पालकांच्या सोशल मीडिया पोस्टवर दिसतात. यामुळे चाहत्यांना दत्त कुटुंबाची झलक दिसते. मात्र या पोस्टने कुटुंबात काही बिनसले आहे का, हे पाहावे लागेल.

# सकिनाच्या निमित्ताने स्मरण



चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकारांबद्दल बोलायचे म्हटले तर सईद जाफरी यांचे नाव नक्कीच वरच्या स्थानी समाविष्ट असेल. त्यांनी अनेक चित्रपटांमधून सहाय्यक भूमिका साकारून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. त्याचमुळेच हयात नसले तरी या त्या निमित्ताने त्यांच्या नाव ओठांवर येतच असते.


मात्र आत्ता त्यांचे स्मरण होण्याचे मोठे कारण म्हणजे त्यांची मुलगी सकिना जाफरी. सकिना प्रसिद्ध अभिनेत्री आहे, परंतु तिने आपल्या वडिलांचे नाव बॉलिवूडमध्ये नव्हे तर हॉलिवूडमध्ये प्रसिद्ध केले आहे. तेव्हा आज वडिलांचा वारसा चालवणाऱ्या सकिनाबद्दल थोडे अधिक जाणून घेऊ या.

सईद जाफरी यांचे पहिले लग्न १९५८ मध्ये मधुर जाफरीसोबत झाले होते. मधुरजी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री होत्या. सईद आणि मधुरचे लग्न आठ वर्षे टिकले. त्यांना एक मुलगी झाली. तिचे नाव सकिना जाफरी आहे. पुढे सईदशी घटस्फोट घेतल्यानंतर मधुरने अमेरिकन व्हायोलिन वादक सॅनफोर्ड एलनशी लग्न केले आणि मुलगी सकीनासह त्या कायमच्या परदेशात स्थायिक झाल्या. पण या कारणामुळे सकीनाने बॉलिवूडऐवजी हॉलिवूडमध्ये अभिनेत्री म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली आणि आज ती तिथल्या प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक गणली जाते.

सकीनाने वडिलांचा वारसा जपत आत्तापर्यंतच्या अभिनय कारकिर्दीतद्वारे सईद जाफरी यांचे नाव मोठ्या उंचीवर नेले आहे. आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे सकीनाने सावत्र वडिलांना आयुष्यात वडिलांचे स्थान कधीच दिले नाही. आईला घटस्फोट देण्यामागे वडिलांचा कोणताही दोष नसल्याचे तिचे म्हणणे आहे.

६३ वर्षीय सकीनाने १९८८ मध्ये ‘द परफेक्ट मर्डर’ द्वारे अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली. तेव्हापासून म्हणजेच तीन दशकांहून अधिक काळ ती हॉलिवूडमध्ये सक्रिय आहे. ‘डेलाइट’, ‘रिव्होल्यूशन नंबर ९’, ‘रायझिंग हेलन’, ‘वॉकिंग ड्रीम्स’, ‘बी होल्ड माय हार्ट’, ‘ले नाईट’, ‘मिस मार्वल’, ‘घोस्ट’, ‘बिलियन्स’ असे काही लोकप्रिय चित्रपट तिच्या नावाने ओळखले जातात. अशा चित्रपट आणि काही मालिकांमधून सकीना जाफरीने उत्कृष्ट अभिनय कौशल्य दाखवले आहे. तिच्या रुपाने आजही सईद जाफरी यांचे नाव मनोरंजनविश्वात चर्चेत राहात आहे.

# मनीष मल्होत्राचा पडद्याकडे मोर्चा



क नुकताच प्रख्यात फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा यांनी त्यांच्या ‘गुस्ताख इश्क’चा टीझर प्रदर्शित केला. हा चित्रपट जुन्या काळातील प्रेमकथेवर आधारित असून त्यात विजय वर्मा, फातिमा सना शेख, नसीरुद्दीन शाह आणि शरीब हाश्मी यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

टीझरमध्ये विजय-फातिमा यांच्यातील रोमँटिक केमिस्ट्री दिसून आली. चित्रपटाच्या या पहिल्या टीझरमध्ये एका ऐतिहासिक प्रेमकथेचे रुप दिसत असून त्यात विजय आणि फातिमा एकमेकांच्या प्रेमात वेडे झाल्याचे दाखवण्यात आले आहे. संगीतात विंटेज व्हाइब्स आणण्यासाठी ओळखले जाणाऱ्या विशाल भारद्वाज यांनी या चित्रपटाला संगीत दिले आहे. गाणी गुलजार यांची आहेत. नसीरुद्दीन शाह विजय आणि फातिमाच्या प्रेमकथेत खलनायकाची भूमिका साकारत आहेत.

याआधी चित्रपटाचे नाव ‘उल जलुल इश्क’ असे होते. मात्र टीझर नवीन शीर्षकासह प्रदर्शित झाला आहे. ‘गुस्ताख इश्क – कुछ पहले जैसा’ या वर्षी नोव्हेंबरमध्ये प्रदर्शित होईल. मल्होत्राने भाऊ दिनेश मल्होत्रासोबत ‘स्टेज ५ प्रॉडक्शन कंपनी’ अंतर्गत चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपट निर्माते म्हणून बॉलिवूडमध्ये पाऊल ठेवण्याबद्दल बोलताना मनीष मल्होत्रा म्हणाले, ‘बालपणापासूनच मी चित्रपटसृष्टीवर प्रेम करतो. लहान वयातच रुपेरी पडदा माझ्यासाठी जगाचा दरवाजा होता...

# सत्य की केवळ अफवा?



आदेश बांदेकर यांचा लेक सोहम अभिनेत्री पूजा बिराराशी लग्न करणार असल्याची चर्चा रंगत आहे. पूजा आणि सोहम एकमेकांना डेट करत असून ते प्रेम विवाह करणार असल्याचे म्हटले जात होते. मात्र पूजाने सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टने सर्वांचे लक्ष वेधले. या पोस्टने त्यांच्या लग्नाच्या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. पूजा आणि सोहम कधीही एकत्र दिसले नाहीत, त्यांनी कधीही एकत्र फोटो शेअर केले नाहीत. तरीही त्यांच्या लग्नाच्या चर्चा ऐकून पूजा नाराज असल्याचे पोस्टमधून स्पष्ट दिसत आहे. पूजाने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटच्या स्टोरीला पोस्ट शेअर केली आहे. ‘खरे माहीत असणाराच शांत राहतो. बाकीच्यांना काहीच माहिती नाही. पण तेच जास्त बोलतात आणि सगळ्यांना सांगत गवगवा करतात...’ या आशयाची पोस्ट तिने लिहिली आहे.

पूजाने केलेली ही पोस्ट सोशल मीडियावर सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. या पोस्टवरुन स्पष्ट होत आहे की ती आणि सोहम रिलेशनशिपमध्ये नाहीत आणि त्यांच्या लग्नाची बातमी केवळ अफवा आहे. सोहम बांदेकर अभिनेत्री सुचित्रा बांदेकर आणि अभिनेते आदेश बांदेकर यांचा मुलगा असून ‘ठरलं तर मग’ या गाजलेल्या मालिकेच्या निर्मितीची जबाबदारी सांभाळत आहे. पूजा बिरारी देखील प्रसिद्ध अभिनेत्री असून ‘येड लागलं प्रेमाचं’ या मालिकेत तिने महत्त्वाची भूमिका साकारली आहे. तेव्हा या दोघांचे नाते कसे रंग घेते हे लवकरच कळेल.

# येतोय आणखी एक स्टारकिड



नवोदित अहान पांडे आणि अनित यांचा रोमँटिक म्युझिकल ड्रामा असणारा ‘सैयारा’ या वर्षीच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक आहे. कमी बजेटमध्ये बनवलेल्या ‘सैयारा’ने चार पट जास्त कमाई केली आणि निर्मात्यांचे खिसे भरले. मुख्य कलाकार अहान आणि अनित यांच्या अभिनयाचे प्रचंड कौतुकही झाले. नुकतेच या चित्रपटाच्या यशावर सुनीता आहुजा यांनी प्रतिक्रिया दिली. सुनीताला एका मुलाखतीत यश म्हणजेच तिच्या मुलाच्या देखणेपणावर प्रश्न विचारला असता खरे पाहता तो ‘सैयारा’मध्ये असायला हवा होता, असे म्हणाली. यश गोविंदा आणि सुनीता आहुजाचा मुलगा आहे.

मात्र पुढे सुनीता यशने यापेक्षा चांगला चित्रपट करावा अशी माझी इच्छा आहे... असेही म्हटले. मी अजून ‘सैयारा’ पाहिलेला नाही. पण यशने तो दोनदा पाहिला आहे. मी तो पाहेन. तो येत्या १४ तारखेला नेटफ्लिक्सवर येत आहे. इंडस्ट्रीत अनेक चांगली मुले येत आहेत. त्या सगळ्यांना माझ्या शुभेच्छा. प्रार्थना आहे की सर्व मुले खूप नाव कमावतील... असा मुलाखतीचा समारोप करताना सुनीता म्हणाली.

लवकरच यश वयाच्या २८ व्या वर्षी मनोरंजन विश्वात पदार्पण करणार आहे. त्याचा आगामी चित्रपट साई राजेशच्या तेलुगू ‘बेबी’ (२०२३) चा हिंदी रिमेक असेल. तथापि, त्याच्यासोबत मुख्य भूमिका कोण साकारत आहे याबद्दल अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

सध्या सुनीता आहुजा पती गोविंदा त्यांच्या घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत आले. सहा महिन्यांपूर्वी अभिनेत्याच्या पत्नीने घटस्फोटासाठी अर्ज केल्याची चर्चा रंगली होती. मात्र मुलगी टीना आणि तिच्या मॅनेजरने या अफवा फेटाळून लावल्या होत्या. गोविंदाच्या वकिलाने म्हटले होते की हे प्रकरण जुने आहे. आता दोघांमध्ये गोष्टी चांगल्या होत आहेत. मात्र असे असताना समाज माध्यमांमध्ये पुन्हा एकदा या दोघांच्या घटस्फोटाची चर्चा रंगत काय ते जाणून घेण्यासाठी गोविंदाचे चाहते उत्सुक आहेत.

# खेळ रंगू लागला...



कलर्स वाहिनीवर रिॲलिटी शो ‘बिग बॉस १९’ सुरू झाला आहे. यावेळी सलमान खानच्या या शोमध्ये १६ स्पर्धकांनी प्रवेश केला असून २४ तासांनंतर एक स्पर्धक बेदखलताही झाली आहे. फरहाना भट्ट घरातून बेदखल होणारी पहिली स्पर्धक ठरली आहे. पण यामध्येही एक ट्विस्ट आहे.

‘बिग बॉस सीझन १९’ चा ग्रँड प्रीमियर आयोजित करण्यात आला होता. यामध्ये फरहाना भट्ट स्पर्धक म्हणून घरात सामील झाली. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे २४ तासातच ती बाहेर पडली.

फरहाना भट्ट मूळची काश्मीरची असून अभिनेत्री आहे. तिने हिंदी चित्रपटसृष्टीत अभिनेत्री म्हणून खास ओळख निर्माण केली आहे. ‘लैला मजनू’ आणि ‘नोटबुक’ सारख्या चित्रपटांद्वारे तिने आपले अभिनय कौशल्य दाखवले आहे. पण ‘बिग बॉस १९’ ने तिला प्रतिभा दाखवण्याची संधी दिली नाही. पहिल्या एपिसोडनंतरच तिला घराबाहेर काढण्यात आले. याचे कारण म्हणजे पहिल्या दिवशी बिग बॉसने सर्व घरातील सदस्यांना एक टास्क दिला होता आणि सांगितले होते की, घरात १५ बेड आणि १६ स्पर्धक आहेत. या आधारावर, घरात राहण्यास योग्य नसणाऱ्या सदस्याचे नाव सांगा. या प्रकरणात, फरहाना भट्टने स्पर्धक मृदुल तिवारीचे नाव घेतले. परंतु इतर सर्व सदस्यांनी फरहानाचे नाव घेतले आणि त्यामुळेच घराबाहेर काढण्यात आले. फरहाना भट्टच्या वृत्तीवर बरेच प्रश्न उपस्थित झाल्याचे बोलले जात आहे.

मात्र सत्य हेदेखील आहे की ती अद्याप शोमधून पूर्णपणे बाहेर पडलेली नाही. उलट, बिग बॉसने तिला एका गुप्त खोलीत ठेवले आहे आणि तिथून ती सर्व सदस्यांचे ऐकत आहे. येणाऱ्या काळात ती ‘बिग बॉस १९’ मध्ये परतताना दिसेल.

# बॉक्स ऑफिसवरही ‘नरसिंह’



आजकाल ॲनिमेटेड चित्रपट बॉक्स ऑफिसवर राज्य करताना दिसत आहेत. सहसा अशा चित्रपटांची क्रेझ मुलांमध्ये जास्त दिसते, परंतु ‘महावतार नरसिंहा’चे नाव अशा निवडक ॲनिमेटेड चित्रपटांच्या यादीत समाविष्ट झाले आहे ज्यांची क्रेझ सर्व वयोगटातील प्रेक्षकांमध्ये दिसून येते. कमाईच्या बाबतीत बोलायचे तर तो काही स्टारर चित्रपटांवर वर्चस्व गाजवताना दिसत आहे. ३२ व्या दिवशीची त्याची कमाईदेखील नोंद घेण्याजोगी आहे.